# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ९५

विभाग :-घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :-०३/०५/२०२१

---

विषय :- कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विलगीकरण कक्ष, मनपा दवाखाने, कंटमेंट झोन व मनपा कार्यालयामध्ये फवारणी करणेकामी सोडियम हायपोक्लोरोईड १०% हे जंतुनाशक खरेदी करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- जगभरात कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाने थैमान घातले असून सद्यस्थितीत कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाचे रुग्ण मोठया प्रमाणात आढळून येत आहेत. वाढत्या रुग्ण संख्येमुळे कंटमेंट झोन हि संख्या मोठया प्रमाणात वाढ आहे. वाढती रुग्ण संख्या लक्षात घेता मनपाने विलगीकरण कक्ष, दवाखाने, कंटमेंट झोन, मनपा कार्यालये इत्यादी ठिकाणी सॅनिटायझर फवारणी करणेकामी मनपाच्या आस्थापनेवरील ४६ कायम सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तरी वरील ठिकाणी सॅनिटायझर फवारणी करणेसाठी सोडियम हायपोक्लोरोईड १०% खरेदीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) (क) नुसार विना निविदा खरेदी करण्यास प्रशासकीय ठराव क्र.६७ दिनांक २३/०४/२०२१ अन्वये प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली आहे. तरी सदरील ठरावानुसार विना निविदा थेट सोडियम हायपोक्लोरोईड १०% अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणेकरीता प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | जंतुनाशकाचे नाव | आवश्यक असणारे प्रमाण | अभिकर्त्याचे नाव | प्रति लिटर रक्कम रु. | १८% GST सह | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोडियम हायपोक्लोरोईड १०% | १२००० लि. | मे.अजय केमिकल्स | रु.२०/- | रु.२३.६०/- | रु.२,८३,२००/- |
| २ | | | मे.श्री केमिकल्स | रु.२६/- | रु.३०.६८/- | रु.३६,८१६/- |
| ३ | | | मे.केतुल इंटरनॅशनल | रु.२३ | रु.२७.१४/- | रु.३२,५६८/- |

D:\Aarogy\All purches Item\sodium hico plastic pump/Tipani

वरीलप्रमाणे सोडियम हायपोक्लोरोईड १०% चे अधिकृत विक्रेत्यांपैकी मे.अजय केमिकल्स यांचे दर वाजवी असल्याने व कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता १२,००० लिटर सोडियम हायपोक्लोरोईड १०% या जंतुनाशकाची आवश्यकता आहे. सदरील जंतुनाशकासाठी रु.२३.६०/- प्रमाणे १२०० लिटर सोडियम हायपोक्लोरोईड १०% हे जंतुकिटकनाशक मे.अजय केमिकल्स यांच्याकडून थेट खरेदी केल्यास रक्कम रु.२,८३,२००/- एवढा खर्च होणार आहे. तरी सदरील खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील एकात्मिक डास निर्मुलन योजना या लेखाशिर्षाच्या अंतर्गत तरतुद रक्कम रु.३० कोटी मधून भागविणे शक्य आहे. तरी कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता सोडियम हायपोक्लोरोईड १०% या जंतुनाशकाचे अधिकृत विक्रेते मे.अजय केमिकल्स यांचेकडून खरेदी करणेस रक्कम रु.२,८३,२००/- खर्च अपेक्षीत आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ‘ड’ प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) (क) अन्वये मे.अजय केमिकल्स यांच्याकडून थेट खरेदी करुन त्यांच्या सोबत करारनामा करुन कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

**ठराव निर्णय :-** कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विलगीकरण कक्ष, मनपा दवाखाने, कंटमेंट झोन व मनपा कार्यालयामध्ये फवारणी करणेकामी सोडियम हायपोक्लोरोईड १०% हे जंतुनाशक खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ‘ड’ प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) (क) अन्वये मे.अजय केमिकल्स यांच्याकडून थेट खरेदी करुन करारनामा करुन कार्यादेश देणेस व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

D:\Aarogy\All purches Item\sodium hico plastic pump/Tipani

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. ९६

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-03/05/2021

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर स्मशानभुमी, वसई (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेबाबत...

---

**प्रस्तावाचा मजकुर :-** जगभरात पसरलेल्या कोरोना (COVID-19) विषांणुच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केले आहेत. याच प्रतिबंधात्मक उपाय-योजनेचा भाग म्हणुन कोरोना (COVID-19) विषांणुच्या संसर्गामुळे मृत पावणारे शरीर ठेवणेकरिता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पाचुबंदर स्मशानभुमी, वसई (पु) येथे शवपेटी (मॉच्युरी) बसविणेबाबत मा.आयुक्त सो., यांचे दालनात डॉक्टर व अभियंता समावेत झालेल्या रुग्णालयीन कामकाजाच्या आढावा बैठकित सुचित केले आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात शवपेटी (मॉच्युरी) बसविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणेची कामे मे.एरियांझ यांचे कडुन सातत्याने करणेंत येतात. याकरिता, संदर्भिय क्र.1 अन्वये मे.एरियांझ यांना विचारणा केली असता त्यांनी मुख्यालय आवक क्र.22, दि.28/04/2021 रोजीचे पत्रान्वये दर (कोटेशन) महानगरपालिकेस सादर केले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | एच | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर स्मशानभुमी, वसई (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | स्टेनलेस स्टील 304 व 80mm जाडीची 12 मृत शरीर ठेवणेकरिता शवागार पेटी, कॉपर पाईप, 200 स्के.फुट x 160 डक्टींगचे आवरण, इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनल, 900 क्युबीक फिट पर मीटर क्षमतेचे एअर हॅन्डलिंग युनिट (12 स्टेचर सह) ॲल्युमिनीअम एरो फाईल डॅम्पर, 3 टन क्षमतेचे कन्डेंसर युनिट, व्होल्टेज स्टॅबिलायझर-1 नग इ. बसवुन कार्यान्वित करणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणे. अंदाजपत्रकीय रक्कम : 17,85,340/- | मे.एरियांझ |

सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.30/04/2021 रोजीचे ठराव क्र. 93 अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे.

तरी सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण-5, संविदा-2 (2) नुसार निविदा न काढता उत्पादक मे.एरियांझ यांचे कडुन प्राप्त दरानुसार करुन घेणेकरिता संविदा करुन कार्यदिश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर स्मशानभुमी, वसई (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकरिता **उत्पादक मे.एरियांझ** यांचे कडुन प्राप्त दरानुसार काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305**

दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकिय ठराव क्र. ९७ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-03/05 /2021

**प्रस्तावाचा विषय** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील कौलसिटी कोरोना केअर सेंटर रुग्णालयात नव्याने वातानुकुलित यंत्रणा व विद्युतीकरणाची कामे करणे कामास संविदा करणेंस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सध्या राज्यात कोरोना (कोविड-19) विषाणूंचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसुन आले आहे आणि या प्रादुर्भावामुळे कोरोना (कोविड-19) चा संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली असुन, जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यास्तव कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेंकरिता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (एच) कार्यक्षेत्रातील कोरोना बाधित रुग्णांच्या उपचारासाठी कौलसिटी कोरोना केअर सेंटर (रुग्णालय) उभारण्यात आले आहे.

सदर रुग्णालयातील तळमजला येथे ICU विभाग, पहिला माळा येथे अलगीकरण कक्ष-1 व दुसरा माळा येथे अलगीकरण कक्ष-2 यामध्ये वेंटिलेटर बेडचे प्रयोजन करण्यात येणार आहे. वेंटिलेटर मशिन व वैद्यकिय उपकरणे गरम होऊन नादुरुस्त होऊ नयेत याकरिता सदर ठिकाणी वातानुकुलित यंत्रणा बसविणे गरजेचे असलेबाबत प्र.नियंत्रण अधिकारी, कौल सिटी समर्पित कोव्हीड रुग्णालय यांनी सुचविले होते.

याकरिता, सदर इमारतीत खालील नमुद केलेप्रमाणे वातानुकुलित यंत्रणा व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिता संदर्भिय क्र.2 अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप / अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील कौलसिटी कोरोना केअर सेंटर रुग्णालयात नव्याने वातानुकुलित यंत्रणा व विद्युतीकरणाची कामे करणे. | वातानुकुलित यंत्रणा 1.5 टन-14 नग, कॉपर पाईप-50 मी, इन्व्हर्टर 2500VA-1 नग, बॅटरी 200 AH-2 नग, स्टॅन्ड फॅन 450 mm-10 नग, सिलिंग फॅन 1200mm-5 नग, टयुब लाईट-10 नग, 5/15 A मॉडयुलर बॉक्स-7 नग, 12 मॉडयुलर स्विच बॉक्स-20 नग, पॉईट वायरींग-60 नग, इंडीकेटर-20 नग, SPMCB-20 नग, 3x6sq.mm कॉपर केबल -480 मी, 4x6sq.mm कॉपर केबल-50 मी, 4x16 sq.mm ऍल्युमिनियम केबल-70 मी, 4x70sq.mm ऍल्युमिनियम केबल-30 मी, 4x120 sq.mm ऍल्युमिनियम केबल-90 मी, MCCB panel board-1 नग, डिस्ट्रीबीशन बॉक्स 24way-3 नग, 3 पोल MCCB 200A-1 नग, न्युट्रल लिंक-1 नग, चेंज ओवर 200A-2 नग, बसबार 200A-1 नग, डिजिटल एम मीटर-1 नग, डिजिटल व्होल्ट मीटर-1 नग, करंट ट्रान्सफॉर्मर-1 नग, LED इंडीकेटर-3 नग, अर्थिंग प्लेट-2 नग, कॉपर वायर-8 कि.ग्रॅ., FPMCB 40 A To 63 A-22 नग, SPMCB 6 A TO 32 A-30 नग, 2x10 कॉपर वायर-30 मी, CRCA Sheet Box-3 नग, DWC पाईप 75 एम.एम-82 मी, GI पाईप-18 मी , अंदाजपत्रकीय रक्कम - 15,76,445/- | मे.यश इंजिनिअरिंग |

उपरोक्त कामांचे सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. सदर कामी होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "नैसर्गिक आपत्ती इतर" या लेखाशिर्षकातील रक्कम 10,00,00,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

वर नमुद केलेल्या बाबीनुसार येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये मा.आयुक्त सो., यांनी दि.     /04/2021 रोजीचे ठराव क्र.       अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे. परंतु, सद्यस्थितीत कोरोना (कोविड-19) विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे निविदा प्रक्रिया राबवुन काम करुन घेण्यास विलंब होईल.

"वैद्यकिय आरोग्य सेवा" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील कौलसिटी कोरोना केअर सेंटर रुग्णालयात नव्याने वातानुकुलित यंत्रणा व विद्युतीकरणाची कामे करणे करिता शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार **मे.यश इंजिनिअरिंग** यांचे कडुन सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर **5% कमी दराने** काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५**
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. ९८ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-०३ /०५ /2021

---

**प्रस्तावाचा विषय** :- **"कोरोना विषाणु (कोविड-१९) आपत्तकालीन व्यवस्था"**
वसई विरार शहर महानगरपालिका चंदनसार कार्यक्षेत्रातील भाजी मार्केट कातकरी पाडा येथे मोकळया जागेत स्थलांतरीत केल्याने दिवाबत्ती व्यवस्था करणे कामास संविदा करणेंस मान्यता मिळणेबाबत...

---

**प्रस्तावाचा मजकुर :-** जगभरात पसरलेल्या कोरोना (COVID-19) विषांणुच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केले आहेत. याच प्रतिबंधात्मक उपाय-योजनेचा भाग म्हणुन चंदनसार कार्यक्षेत्रातील श्री जीवदानी देवी रुग्णालयाच्या परीसरातील मोकळया जागेत भरणारे भाजी मार्केट कातकरी पाडा येथील मोकळया जागेत स्थलांतरीत करणेंत येणार आहे.

यांकरिता स्थलांतरीत करण्यात येणाऱ्या जागेवर सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था तातडीने करणे गरजेचे आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती | कामाचे नाव | कामाचे स्वरुप / अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | सी | वसई विरार शहर महानगरपालिका चंदनसार कार्यक्षेत्रातील भाजी मार्केट कातकरी पाडा येथे मोकळया जागेत स्थलांतरीत केल्याने दिवाबत्ती व्यवस्था करणे. | एल.ई.डी स्ट्रीट लाईट फिटींग 70-75 वॅट - 10 नग, 4 x 6 स्के.एम.एम आर्मड केबल - 510 मीटर अंदाजपत्रकिय रक्कम :- 1,39,903/- | मे.साई वैभव इलेक्ट्रीकल्स |

उपरोक्त नमुद कामाचे सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दर सुचीनुसार रक्कम 1,39,903/- रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. त्यास **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये उप-आयुक्त (विदयुत) यांनी दि.30/04/21 रोजीचे जा.क्र.वविशम/विदयुत/49/21-22** नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे.

परंतु, सद्यस्थितीत कोरोना (कोव्हीड-19) विषाणुंचा प्रादुर्भाव असल्याने निविदा प्रक्रिया राबवुन काम करुन घेण्यास विलंब होईल. तसेच, सदर कामे तातडीने करणे आवश्यक आहे.

याकरिता, सदर काम **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2** नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन **मे.साई वैभव इलेक्ट्रीकल्स** यांचे मार्फत दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर 5% कमी दराने काम करुन घेणेंकरिता संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका चंदनसार कार्यक्षेत्रातील भाजी मार्केट कातकरी पाडा येथे मोकळया जागेत स्थलांतरीत केल्याने दिवाबत्ती व्यवस्था करणे करिता शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार **मे.साई वैभव इलेक्ट्रीकल्स** यांचे कडुन सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्रं. ९९

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-०४/०५/२०२१

---

**विषय** :- अग्निशमन विभागास फोम खरेदी करणे करीता येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेचे अग्निशमन दलामार्फत नागरीकांना अग्निशमन व आणीबाणी सेवा पुरविण्यात येते. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये शहराचा विकास झपाटयाने होत असल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. नवघर (पूर्व) , वालीव, गोखिवरे, गौराईपाडा, पेल्हार, कामण, विरार व पापडी हया भागात मोठया प्रमाणात औद्यागिक वसाहती असून आग लागण्याच्या दुर्घटना सातत्याने होत असतात तसेच महानगरपालिका हद्दीमधून मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय महामार्ग जात असून मोठया प्रमाणात वाहनांची वर्दळ असते.

महानगरपालिका क्षेत्रालगत वाडा, भिवंडी, मिरा-भाईंदर, तारापूर, पालघर, बोईसर इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणात औद्योगिक वसाहती आहेत. महानगरपालिका क्षेत्रात इंडियन ऑईल या कंपनीचा मोठया प्रमाणात तेल साठा वसई स्टेशन लगत आहे तसेच औद्योगिक वसाहतीमध्ये रासायनिक सामुग्रीला आग लागल्यास तसेच वाहन अपघात किंवा वायू / रसायन गळतीच्या दुर्घटना घडल्यास सदर आग विझ् विण्यासाठी AFFF फोम कंपाऊंडचा उपयोग होतो.

वसई-विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा ३) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ४) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) ५) सनसीटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (प.) ६) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ७) नवघर अग्निशमन केंद्र, वसई (पूर्व) अशी एकुण सात अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत.

दरवर्षी उपरोक्त अग्निशमन केंद्राकरीता अंदाजीत २००० लिटर फोमची आवश्यकता लागते. यापुर्वी २०१९ मध्ये ई-निविदा मागवून मे. के.व्ही. फायर केमिकल (इ.) प्रा.लि. यांचेकडून २००० लिटर फोम खरेदी करण्यात आला होता. सद्या उपरोक्त केंद्रावर १५४० लिटर फोम साठा शिल्लक आहे. व नव्याने फोम खरेदी करणे आवश्यक्र आहे. तरी अग्निशमन विभागाकरीता २००० लिटर AFFF फोम खरेदी करण्यास अंदाजीत रक्कम रु. १,७०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर ०४ नंबर लेखाशिर्ष अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी यामध्ये एकुण वार्षिक रुपये ६०,००,०००/- तरतुद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी अग्निशमन विभागाकरीता २००० लिटर AFFF फोम दरपत्रक प्रसिध्द करुन खरेदी करणेस व येणा-या अंदाजीत रक्कम १,७०,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) अन्वये मा. आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्य मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

<u>**ठराव :-**</u> वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता २००० लिटर AFFF फोम दरपत्रक मागवून खरेदी करणेस येणा-या रक्कम रु. १,७०,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** १००

विभाग :- वैद्यकिय आरोग्य विभाग
दिनांक :- ०४ /०५/ २०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- **"कोरोना विषाणु (COVID-१९) आपत्तकालीन व्यवस्था"**
वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोविड रुग्णालयाच्या ठिकाणी ऑक्सीजन जनरेटर प्लांट कार्यन्वीत करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे तसेच म.म.अ.कलम ५ (२) २ अंतर्गत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

**अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. ४२,५६,०००/-**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील (कोविड-१९) रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत जगभर पसरलेल्या कोरोना (कोविड-१९) विषांणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केल्या आहेत. या प्रतिबंधात्मक उपाय-योजनांचा भाग म्हणुन कोरोना (कोविड-१९) विषांणुच्या संसर्ग रोखण्यासाठी शासनाने स्थानीक स्तरावर आवश्यकती कार्यवाही पार पाडण्याबाबत निर्देश दिले आहेत. महापालिका क्षेत्रात देखील कोविड-१९ अंतर्गत बाधीत रुग्णांची संख्या दिवसागणीक वाढत असून उपचार घेणाऱ्या रुग्णांना ऑक्सीजनचा पुरवठा अपुरा पडत आहे. त्याअनुषंगाने तातडीने ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणी करणे आवश्यक आहे. जेणे करुन ऑक्सीजनचा पुरेसा साठा महानगरपालिकेकडे उपलब्ध राहून अतिदक्ष विभागातील रुग्णांचा जीव वाचवण्यास मदत होवू शकते.

सद्य:स्थितीत कोविड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे बाधीत रुग्णांच्या संखेत वाढ होत असून रूग्णांना आवश्यक ऑक्सीजनचा साठा अपुरा पडत असल्याने अशा आणीबाणीच्या परिस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७-३ (क) नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असलेल्या ऑक्सिजन जनरेटर प्लांन्ट करीता तातडीची बाब म्हणुन मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी विविध ठिकाणी प्रस्तावित कोविड रुग्णालयांकरीता ऑक्सीजन जनरेटर प्लांट कार्यन्वीत करणे कामी निर्देश दिले आहेत.

याकामी मे.प्रतिभा स्पेशॅलिटीज ॲण्ड सर्व्हिस, डी/४४, १ला मजला, ओल्को आर्केड, हिल रोड, वांद्रे, मुंबई यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेस आवश्यक १०० Cylinder per Day क्षमता असलेला ऑक्सिजन जनरेटर प्लान्ट उभारणी करणे करिता रु.३८,००,०००/- + जी.एस.टी. चे कोटेशन सादर केले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

...२

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | Design, supply, install, testing & commissioning of Onsite oxygen generator with air compressor / Refrigeration Air dryer Air Tank / Oxygen Tank Filters (Pre, After, and Bacteria Filters) oxygen generator with PLC based controller with inbuilt sensor, Manifold system for secondary oxygen supply, to suit equivalent to 100 Cylinder per day. Suit for 500 LPM. and 30 cum/hr. (including 1 year AMC) As per Gov Guidelines. | **रु.३८,००,०००/-** |
| | **GST (12%)** | रु.४,५६,०००/- |
| | **एकूण** | **रु. ४२,५६,०००/-** |

वरील मे.प्रतिभा स्पेशॅलिटीज ॲण्ड सर्व्हिस, मुंबई यांचा दर योग्य वाटत असून सदर उत्पादक एक महिन्यात ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारून देणार आहेत. त्यामूळे तातडीने करावयाच्या कार्यवाही अनुषंगाने सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २ (२) नुसार निविदा न मागविता मे.प्रतिभा स्पेशॅलिटीज ॲण्ड सर्व्हिस, मुंबई यांच्या सोबत वरील दरा प्रमाणे संविदा करून कार्यादेश दिल्यास नागरीकांना वेळेत सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

उपरोक्त कामाचा होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील "**नैसर्गिक आपत्ती व इतर** " या लेखाशिर्षकातील रक्कम १०,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब प्रस्तावित कोविड रुग्णालयाकरीता ऑक्सीजन जनरेटेड प्लान्ट उभारणे कामी येणाऱ्या रू. **४२,५६,०००/-** च्या खर्चाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७-३(क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर तसेच कोविड रुग्णालयाकरीता ऑक्सीजन जनरेटेड प्लांन्ट उभारणे कामी निविदा न मागविता **मे. मे.प्रतिभा स्पेशॅलिटीज ॲण्ड सर्व्हिस, वांद्रे, मंबई** यांच्या सोबत संविदा करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) नुसार मान्यतेसाठी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे पुढे सविनय सादर.

---

**ठराव :-**

१. वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव झापाट्याने होत असून नागरीकांना वैद्यकिय उपचाराची नितांत गरज आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील प्रस्तावित कोविड रुग्णालयांकरीता ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणे आवश्यक आहे.
२. सदर रुग्णायाच्या ठिकाणी तातडीने ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७-३ (क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

...३

३. उपरोक्त विषयांकित कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) अन्वये निविदा न मागविता **मे. प्रतिभा स्पेशॅलिटीज ॲण्ड सर्व्हिस, वांद्रे, मंबई** यांस समवेत संविदा करून कार्यादेश देण्यास व या कामी येणाऱ्या रक्कम रू. **४२,५६,०००/-** (GST सह) खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

**(गंगाथरन डी.) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305**
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ९०७ — विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :०४/०५/2021

**प्रस्तावाचा विषय** :- "कोरोना विषाणु (कोविड-19) आपत्तकालीन व्यवस्था"
वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर, विराट नगर, नवघर व फुलपाडा स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामाच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेबाबत...

**प्रस्तावाचा मजकुर** :- जगभरात पसरलेल्या कोरोना (कोविड-19) विषांणुच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केले आहेत. देशभरात कोरोना (कोविड-19) विषांणुच्या संसर्गामुळे झपाट्याने वाढणारी रुग्णांची संख्या व मृताचे प्रमाण लक्षात घेता, शासनाने करोना संसर्गिक रुग्णांचे मृत शरीर विद्युत / गॅस दाहिनीवर दहन करणेबाबत निर्देश दिले आहे.

त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात 1) पाचुबंद स्मशानभुमी, वसई (प), 2) विराट नगर स्मशानभुमी, विरार (प), 3) नवघर स्मशानभुमी, वसई (प) व 4) फुलपाडा स्मशानभुमी, विरार (पु) इ. ठिकाणी गॅस दाहिनी बसविण्याचे काम महापालिकामार्फत सुरु आहे.

सदर गॅस दाहिनी ही विद्युत प्रवाहावर कार्यरत असलेमुळे त्यामध्ये नव्याने योग्य क्षमतेनुसार विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल बसविणे आवश्यक आहे. तसेच वीज कंपनीच्या वीज पुरवठयामध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास पर्यायी अखंडीत वीज प्रवाह करणेंकरिता डिझेल जनित्र व त्या अनुषांगिक विद्युतीय कामे करणे गरजेचे आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | ए | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विराट नगर स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता नव्याने फिडर पिलर पॅनल, सिटी मिटर, डिस्ट्रीब्युशन पॅनल केबलिंग व्यवस्था, व्यवस्था करणे | **फिडर पिलर पॅनल, सिटी मिटर, डिस्ट्रीब्युशन पॅनल केबलिंग व्यवस्था** **पार्ट-1 (फिडर पिलर पॅनल) :-** जी.आय शिट-11 स्के. मी, आर्यन शिट मेटल वर्क-60 कि.गॅ, लॉक-4 नग, 2x10 स्के.एम.एम कॉपर वायर-15 मी, पोर्किलिन/ई-प्रॉक्सी-9 नग, बस पट्टी व बार-27 कि.ग्रॅ, HRC फ्युज-6 नग, HRC कार्टेज-6 नग, 3 पोल MCCB 315A-1 नग, रोट्री हॅन्डल 250A-1 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 400A-1 सेट. **पार्ट-2 (सिटी मिटर) :-** जी.आय शिट-11 स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-50 कि.गॅ, लॉक-4 नग, टर्मिनल स्प्रेर्स-1 सेट, 3 पोल एम.सी.सी.बी-1 नग, **पार्ट-3 (डिस्ट्रीब्युशन पॅनल) :-** जी.आय शिट-45 स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-425 कि.गॅ, चेंज ओव्हर स्विच-1 नग, 3 पोल MCCB 200A-1 नग, FPMCB- 8 नग, DPMCB-10 नग, TPMCB- 5 नग, SPMCB- 10 नग, रोट्री हॅन्डल 250A-4 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 250A-1 सेट, लॉक-26 नग, ॲमिटर-1 नग, व्होल्टमिटर-1 नग, सिलेक्टर स्विच-2 नग, करंट ट्रान्सफॉर्मर-3 नग, पायलेट | 9,56,046/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | लॅम्प-9 नग, 2 पोल पॉवर कॉन्टॅक्टर-1 नग, फ्युज ब्रिज-12 नग, पोर्किलिन / ई-प्रॉक्सी-12 नग, बस पट्टी व बार-82 कि.ग्रॅ, 2x1.5 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 2x2.5 स्के.एम. एम कॉपर वायर-50 मी 2x6 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 2x10 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 4x16 स्के.एम. एम कॉपर वायर-25 मी, अॅल्युमिनीअम लग्ज-1000 नग, न्युट्रल लिंक-2 नग, ओव्हरलोड रिले-1 नग, टाईम स्विच-1 नग<br>**पार्ट-4 (केबल व्यवस्था)** 4x120 स्के.एम. एम आर्मड केबल-300 मी, 4x25 स्के.एम. एम आर्मड केबल-50 मी, ट्रेन्च-150 मी,DWC पाईप - 180 मी, | |
| 2 | ए | वसई विरार शहर महापालिका कार्यक्षेत्रात विराट नगर स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता इन्व्हर्टर व विद्युतीकरण व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे. | **इन्व्हर्टर व विद्युतीकरण व्यवस्था**<br>इन्व्हर्टर-1 नग, बॅटरी-2 नग, पॉईंट वायरींग-7 नग, फ्लड लाईट-6 नग, 4x6 स्के.एम. एम आर्मड केबल-180 मी, | 1,38,037/- |
| 3 | सी | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात फुलपाडा स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता नव्याने फिडर पिलर पॅनल, सिटी मिटर, डिस्ट्रीब्युशन पॅनल केबलिंग व्यवस्था, व्यवस्था करणे | **फिडर पिलर पॅनल, सिटी मिटर, डिस्ट्रीब्युशन पॅनल केबलिंग व्यवस्था**<br>**पार्ट-1 (फिडर पिलर पॅनल) :-**<br>जी.आय शिट-11 स्के. मी, आर्यन शिट मेटल वर्क-60 कि.ग्रॅ, लॉक-4 नग, 2x10 स्के.एम.एम कॉपर वायर-15 मी, पोर्किलिन/ई-प्रॉक्सी-9 नग, बस पट्टी व बार-27 कि.ग्रॅ, HRC फ्युज-6 नग, HRC कार्टेज-6 नग, 3 पोल MCCB 315A-1 नग, रोट्री हॅन्डल 250A-1 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 400A-1 सेट.<br>**पार्ट-2 (सिटी मिटर) :-** जी.आय शिट-11 स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-50 कि.ग्रॅ, लॉक-4 नग, टर्मिनल स्प्रेर्स-1 सेट, 3 पोल एम.सी.सी.बी-1 नग,<br>**पार्ट-3 (डिस्ट्रीब्युशन पॅनल) :-**<br>जी.आय शिट-45 स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-425 कि.ग्रॅ, चेंज ओव्हर स्विच-1 नग, 3 पोल MCCB 200A-4 नग, FPMCB- 8 नग, DPMCB-10 नग, TPMCB- 5 नग, SPMCB- 10 नग, रोट्री हॅन्डल 250A-4 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 250A-1 सेट, लॉक-26 नग, अॅमिटर-1 नग, व्होल्टमिटर-1 नग, सिलेक्टर स्विच-2 नग, करंट ट्रान्सफॉर्मर-3 नग, पायलेट लॅम्प-9 नग, 2 पोल पॉवर कॉन्टॅक्टर-1 नग, फ्युज ब्रिज-12 नग, पोर्किलिन / ई-प्रॉक्सी-12 नग, बस पट्टी व बार-82 कि.ग्रॅ, 2x1.5 स्के.एम.एम कॉपर वायर- | 8,75,960/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 50 मी, 2x2.5 स्के.एम. एम कॉपर वायर-50 मी 2x6 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 2x10 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 4x16 स्के.एम. एम कॉपर वायर-25 मी, ॲल्युमिनीअम लग्ज-1000 नग, न्युट्रल लिंक-2 नग, ओव्हरलोड रिले-1 नग, टाईम स्विच-1 नग<br>**पार्ट-4 (केबल व्यवस्था) :-** 4x120 स्के.एम. एम आर्मड केबल-220 मी, 4x25 स्के.एम. एम आर्मड केबल-50 मी, ट्रेन्च-80 मी, DWC पाईप - 160 मी, | |
| 4 | सी | वसई विरार शहर महापालिका कार्यक्षेत्रात फुलपाडा स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता अखंडीत वीज पुरवठा करणें करिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे. | डिझेल जनित्र व्यवस्था<br>30 केव्हीए डिझेल जनित्र-1 नग, प्लिंथ-1 नग, AMF पॅनल-1 नग | 5,12,511/- |
| 5 | एच | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नवघर स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता नव्याने फिडर पिलर पॅनल, सिटी मिटर, डिस्ट्रीब्युशन पॅनल केबलिंग व्यवस्था, व्यवस्था करणे | **फिडर पिलर पॅनल, सिटी मिटर, डिस्ट्रीब्युशन पॅनल केबलिंग व्यवस्था**<br>**पार्ट-1 (फिडर पिलर पॅनल) :-**<br>जी.आय शिट-11 स्के. मी, आर्यन शिट मेटल वर्क-60 कि.ग्रॅ, लॉक-4 नग, 2x10 स्के.एम.एम कॉपर वायर-15 मी, पोर्किलिन/ई-प्रॉक्सी-9 नग, बस पट्टी व बार-27 कि.ग्रॅ, HRC फ्युज-6 नग, HRC कार्टेज-6 नग, 3 पोल MCCB 315A-1 नग, रोट्री हॅन्डल 250A-1 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 400A-1 सेट.<br>**पार्ट-2 (सिटी मिटर) :-** जी.आय शिट-11 स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-50 कि.ग्रॅ, लॉक-4 नग, टर्मिनल स्प्रेर्स-1 सेट, 3 पोल एम.सी.सी.बी-1 नग,<br>**पार्ट-3 (डिस्ट्रीब्युशन पॅनल) :-**<br>जी.आय शिट-45 स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-425 कि.ग्रॅ, चेंज ओव्हर स्विच-1 नग, 3 पोल MCCB 200A-4 नग, FPMCB- 8 नग, DPMCB-10 नग, TPMCB- 5 नग, SPMCB- 10 नग, रोट्री हॅन्डल 250A-4 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 250A-1 सेट, लॉक-26 नग, ॲमिटर-1 नग, व्होल्टमिटर-1 नग, सिलेक्टर स्विच-2 नग, करंट ट्रान्सफॉर्मर-3 नग, पायलेट लॅम्प-9 नग, 2 पोल पॉवर कॉन्ट्रॅक्टर-1 नग, फ्युज ब्रिज-12 नग, पोर्किलिन / ई-प्रॉक्सी-12 नग, बस पट्टी व बार-82 कि.ग्रॅ, 2x1.5 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 2x2.5 स्के.एम. एम कॉपर वायर-50 मी 2x6 स्के.एम.एम कॉपर वायर-50 | 6,28,283/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मी, 2x10 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 4x16 स्के.एम. एम कॉपर वायर-25 मी, ॲल्युमिनीअम लग्ज-1000 नग, न्युट्रल लिंक-2 नग, ओव्हरलोड रिले-1 नग, टाईम स्विच-1 नग<br>**पार्ट-4 (केबल व्यवस्था) :-** 4x120 स्के.एम. एम आर्मड केबल-220 मी, 4x25 स्के.एम. एम आर्मड केबल-50 मी, ट्रेन्च-80 मी, DWC पाईप - 160 मी, | |
| 6 | | वसई विरार शहर महापालिका कार्यक्षेत्रात नवघर स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता अखंडीत वीज पुरवठा करणें करिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे. | **डिझेल जनित्र व्यवस्था**<br>50 केव्हीए डिझेल जनित्र-1 नग, प्लिंथ-1 नग, AMF पॅनल-1 नग | 6,89,802/- |
| 7 | | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता नव्याने फिडर पिलर पॅनल, सिटी मिटर, डिस्ट्रीब्युशन पॅनल केबलिंग व्यवस्था, व्यवस्था करणे | **फिडर पिलर पॅनल, सिटी मिटर, डिस्ट्रीब्युशन पॅनल केबलिंग व्यवस्था**<br>**पार्ट-1 (फिडर पिलर पॅनल) :-**<br>जी.आय शिट-11 स्के. मी, आर्यन शिट मेटल वर्क-60 कि.ग्रॅ, लॉक-4 नग, 2x10 स्के.एम.एम कॉपर वायर-15 मी, पोर्किलिन/ई-प्रॉक्सी-9 नग, बस पट्टी व बार-27 कि.ग्रॅ, HRC फ्युज-6 नग, HRC कार्टेज-6 नग, 3 पोल MCCB 315A-1 नग, रोट्री हॅन्डल 250A-1 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 400A-1 सेट.<br>**पार्ट-2 (सिटी मिटर) :-** जी.आय शिट-11 स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-50 कि.ग्रॅ, लॉक-4 नग, टर्मिनल स्प्रेर्स-1 सेट, 3 पोल एम.सी.सी.बी-1 नग,<br>**पार्ट-3 (डिस्ट्रीब्युशन पॅनल) :-**<br>जी.आय शिट-45 स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-425 कि.ग्रॅ, चेंज ओव्हर स्विच-1 नग, 3 पोल MCCB 200A-4 नग, FPMCB- 8 नग, DPMCB-10 नग, TPMCB- 5 नग, SPMCB- 10 नग, रोट्री हॅन्डल 250A-4 नग, टर्मिनल स्प्रेडर्स 250A-1 सेट, लॉक-26 नग, ॲमिटर-1 नग, व्होल्टमिटर-1 नग, सिलेक्टर स्विच-2 नग, करंट ट्रान्सफॉर्मर-3 नग, पायलेट लॅम्प-9 नग, 2 पोल पॉवर कॉन्ट्रॅक्टर-1 नग, फ्युज ब्रिज-12 नग, पोर्किलिन / ई-प्रॉक्सी-12 नग, बस पट्टी व बार-82 कि.ग्रॅ, 2x1.5 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 2x2.5 स्के.एम. एम कॉपर वायर-50 मी 2x6 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 2x10 स्के.एम.एम कॉपर वायर-50 मी, 4x16 स्के.एम. एम कॉपर वायर-25 मी, ॲल्युमिनीअम लग्ज-1000 नग, | 8,60,371/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | न्युट्रल लिंक-2 नग, ओव्हरलोड रिले-1 नग, टाईम स्विच-1 नग<br>**पार्ट-4 (केबल व्यवस्था)**<br>4x120 स्के.एम. एम आर्मड केबल-200 मी, 4x25 स्के.एम. एम आर्मड केबल-50 मी, ट्रेन्च-80 मी, DWC पाईप - 160 मी, | |
| 8 | | वसई विरार शहर महापालिका कार्यक्षेत्रात पाचु बंदर स्मशान भुमी मधिल गॅस दाहिनी करिता अखंडीत वीज पुरवठा करणें करिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे. | **डिझेल जनित्र व्यवस्था**<br>30 केव्हीए डिझेल जनित्र-1 नग, प्लिंथ-1 नग, AMF पॅनल-1 नग | 5,12,511/- |

उपरोक्त वर नमुद केलेप्रमाणे स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनीकरिता नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेंकरिता सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार वर नमुद केलेप्रमाणे अंदाजपत्रके बनविणेत आले असुन अनुक्रमांक 1 ते 8 कामांकरिता एकुण रक्कम 51,73,521/- रुपये खर्च अपेक्षित राहील.

सदर कामी होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "नैसर्गिक आपत्ती इतर" या लेखाशिर्षकातील रक्कम 10,00,00,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर, विराट नगर, नवघर व फुलपाडा स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) (क) अन्वये मा.आयुक्त सो. यांचे प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर, विराट नगर, नवघर व फुलपाडा स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामी येणाऱ्या रक्कम 51,73,521/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा पशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - १०२ | विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - ०४/०५/२०२१

**प्रस्तवाचा विषय** - **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ई अंतर्गत सोपारा म.न.पा मैदान जवळ कोविड-१९ हॉस्पीटल येथे ४०,००० लिटर क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP/STP) उभारणेबाबत.**

**प्रस्तवाचा मजकूर** - देशभरात सुरु असलेल्या कोरोना (COVID-19) विषाणूच्या पार्श्वभुमीवर वसई विरार शहर महानगरपालिकेव्दारे प्रभाग समिती ई अंतर्गत सोपारा म.न.पा मैदान जवळ कोविड-१९ हॉस्पीटल मध्ये २५० बेडचे कोविड रुग्णालय सुरु करण्यात येत असून सदर ठिकाणी कोरोना चाचणी करणेकामी RT-PCR Modular Diagnostic Lab, अतिदक्षता विभाग, जनरल कोविड विभाग इ. कार्यान्वित होणार असून सदर ठिकाणी निर्माण होणाऱ्या सांडपाण्यामध्ये सुक्ष्मजैविक रोगकारक विषाणू, लॅब मधील द्रव स्वरुपातील जैविक वैद्यकीय कचरा तसेच मलजल (Sewage) यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. Bombay Nursing Act / महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, १९६९ च्या कायद्यानुसार १० बेड क्षमतेपेक्षा अधिक बेड असलेल्या रुग्णालयात सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP/STP) बसविणे बंधनकारक आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर डी. एम्. पेटीट रुग्णालय, वसई (प) व तुळींज रुग्णालय, नालासोपारा (पु) येथे ४०,००० लिटर क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP/STP) बसविण्यात आलेल्या असून याकामी निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दि. ०७/०२/२०१९ रोजी मे. ग्लोबल इनवायरोज, नवी मुंबई यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर ठेकेदाराने दोन्ही रुग्णालयामध्ये ४०,००० लिटर क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP/STP) बसविणेकामी निर्धारीत अंदाजपत्रकीय रक्कम (रु. ६२,६१,०८०/-) पेक्षा १३% कमी दराने (रु. ५४,४७,१४०/-) काम करण्यास सहमती दर्शवून दोन्ही रुग्णालयामध्ये सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP/STP) उभारणीचे काम विहित मुदतीमध्ये पुर्ण केलेले आहे. निविदेतील अटी-शर्तीनुसार दोन्ही रुग्णालयामध्ये प्रकल्प उभारणी करून पुढील ३ महिन्याचे कालावधीसाठी प्रकल्पांचे देखभाल व दुरुस्तीचे काम देखील संबंधित ठेकेदारामार्फत करण्यात आले व त्यानंतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ई अंतर्गत सोपारा म.न.पा मैदान जवळ कोविड-१९ हॉस्पीटल येथे ४०,००० लिटर क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP/STP) उभारणी करणेकामी आवश्यक निविदा प्रक्रियेमध्ये लागणारा वेळ आणि देशभरात सुरु असलेल्या कोरोना विषाणूच्या पार्श्वभुमीवर तातडीने कोविड रुग्णालय सुरु करण्याच्या दृष्टीने यापूर्वी काम केलेल्या मे. ग्लोबल इनवायरोज कंपनीचे प्रतिनिधी व मा. आयुक्त सो. यांच्यासोबत दि....../....../२०२१ रोजी झालेल्या चर्चेमध्ये मे. ग्लोबल इनवायरोज यांनी कार्यादेश क्रं. वविशम/शअ/बांध/५४०/२०१९ दि. ०७/०२/२०१९ अन्वये मंजूर निविदा रक्कम रु. २७,२३,५७०/- प्रति युनिट (अक्षरी रु. सत्तावीस लक्ष तेवीस हजार पाचशे सत्तर मात्र) नुसार प्रभाग समिती ई अंतर्गत सोपारा म.न.पा मैदान जवळ कोविड-१९ हॉस्पीटल येथे ४०,००० लिटर क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP/STP) उभारणी करणेकामी तयारी दर्शविली आणि या विभागास दि.१४/०४/२०२१ च्या पत्राद्वारे लेखी स्वरुपात कळविले आहे.

**ठराव** - **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ई अंतर्गत सोपारा म.न.पा मैदान जवळ कोविड-१९ हॉस्पीटल येथे ४०,००० लिटर क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP/STP) उभारणे कामी रक्कम रु.२७,२३,५७०/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) नुसार मे.ग्लोबल इनवायरोज या नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागील कामाच्या मंजुर निविदा दरानुसार काम करून घेणेसाठी संविदा करून कार्यदेश देण्यास मंजुरी असे.**

प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र . १०३ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :०५/०५/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) बाजार वॉर्ड येथिल मुख्यकार्यालयीन इमारतीवर नविन शेड उभारणे कामी नोंदणीकृत ठेकेदारामार्फत काम करुन घेणेस संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) बाजार वॉर्ड येथिल मुख्यकार्यालयीन इमारतीवर पावसाळ्यात होणारी पाणीगळती रोखणे करीता नविन शेड उभारणे कामी मा.आयुक्त साो. हयांची ठराव क्र.८३ दि.१९/४/२१ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर कामाची आवश्यकता लक्षात घेता शेड उभारण्याचे काम पावसाळ्यापूर्वी होणे गरजेचे आहे. सदरचे काम ई-निविदा प्रक्रियेने केल्यास ई-निविदा प्रक्रिये करीता लागणारा वेळ, मंजुरी व पुढील कार्यवाही करीता लागणारा कालावधी लक्षात घेता सदरचे काम पावसाळ्यापूर्वी होणे शक्य नाही. सबब सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणीकृत ठेकेदारामार्फत करणे योग्य राहिल. त्याअनुषगांने सदर कामाकरीता मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस हयांनी चालू दरसुची १९-२० नुसार तयार केलेल्या रक्कम रु.३८,८६,३३०/- अंदाजपत्रकानुसार काम करणेस तयार असलेबाबत लेखी स्वरुपात कळविले आहे.

| अंतभूर्त बाब | अंदाजित खर्च | ठेकेदारचे नाव |
|---|---|---|
| brickwork,st,st.steel,G.I sheet,guniting,rain water pipes etc | रु.३८,८६,३३०/- | मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस |

तरी उपरोक्त नमूद काम करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस हयांचे मार्फत राज्य दरसूची नुसार तयार केलेल्या रक्कम रु.३८,८६,३३०/- अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्याच्या पुढील अनुषंगिक कार्यवाहीसाठी मा.आयुक्त साो. हयांचे मंजुरी मिळणेस्तव सादर.

ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) बाजार वॉर्ड येथिल मुख्यकार्यालयीन इमारतीवर नविन शेड उभारणे कामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्यानुसार होणाऱ्या रक्कम रु.३८,८६,३३०/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता सार्व.बांधकाम विभागाचे नोंदणीकृत ठेकेदार मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस यांचे मार्फत राज्य दरसूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देणेच्या पुढील अनुषंगिक कार्यावाहीस मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ४०४ विभाग : उद्यान
दिनांक :०५/०५ /२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :** वसई -विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उद्याने, दुभाजके, हरितक्षेत्र देखभालीकरिता कार्यरत असलेल्या ठेकेदारास उद्यान देखभाल व संगोपन कामाकरिता माहे मार्च २०२० ते माहे मार्च २०२१ या महिन्यांकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :** उपरोक्त विषय व संदर्भान्वये सादर करणेत येते कि, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उद्याने, दुभाजके तसेच हरित क्षेत्र देखभाल व संगोपनकामी खालील नमुद तक्यानुसार ठेक्याने देण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | उद्यान /तलावाचे नाव देखभाल | अस्तित्वात असलेल्या ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|
| १ | चक्रेश्वर तलाव | मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट |
| २ | सी.पी.सोलंकी तलाव | मे.प्रणिक एंन्टरप्रायजेस |
| ३ | साने गुरूजी गार्डन | |
| ४ | शिरगाव तलाव | मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट |
| ५ | निर्मळ तलाव | मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग |

सदर माहे मार्च २०२० पासून कोव्हिड - १९ चा प्रादुर्भावामुळे शासनाच्या आदेशानुसार सार्वजनिक स्थळे लोकांकरीता बंद ठेवणेत आलेली होती. परंतु कोव्हिड-१९ लॉकडाऊन कालावधीत सदर ठेक्याने दिलेले उद्याने, हरित क्षेत्र, तलाव यांची साफ-सफाई तसेच झाडे-झुडपे यांस पाणी मारणे व त्यांची निगा राखणे गरजेचे होते. त्याकरीता वरील नमुद सर्व ठेकेदारांना उद्यान व हरितक्षेत्र व तलावाची देखरेख व संगोपन करणेकामी तोंडी सुचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने ठेकेदारांनी उद्यानांची साफ-सफाई करून झाडा- झुडपात पाणी मारून उद्यान स्वच्छ ठेवलेले आहे. सदर उद्यानांचे चांगल्या प्रकारे देखभाल व संगोपन केल्याचे आणि काम समाधान केल्याचे प्रमाणपत्र प्रभाग समिती सहा.आयुक्त व त्यांच्या अधिनस्त असलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेले आहे.

त्याकरीता वरील नमुद तक्त्यानुसार ठेकेदारांचे कोव्हीड-१९ या कालावधीतले देयक अदा करण्यात आली असुन उर्वरीत ठेकेदारांचे देयके अदा करणे प्रलंबित आहेत.

| अ.क्र. | उद्यान /तलावाचे नाव देखभाल | अस्तित्वात असलेल्या ठेकेदाराचे नाव | रक्कम रू. प्रती महिना | देयक अदा केल्याचा कालावधी | प्रलंबित देयकाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | चक्रेश्वर तलाव | मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट | १,५६,५९८/- | दि.२१ डिसेंबर २०१८ ते माहे मार्च २०२० | माहे एप्रिल २०२० ते माहे मार्च २०२१ |
| २ | सी.पी.सोलंकी तलाव | मे.प्रणिक एंन्टरप्रायजेस | ९६,३८७/- | दि.२१ डिसेंबर २०१८ ते माहे नोव्हेंबर २०२० | माहे डिसेंबर २०२० ते माहे मार्च २०२१ |
| ३ | साने गुरूजी गार्डन | | | | |
| ४ | शिरगाव तलाव | मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट | १,४६,११०/- | दि.१८ सप्टेंबर २०१९ ते माहे सप्टेंबर २०२० | माहे ऑक्टोंबर २०२० ते माहे मार्च २०२१ |
| ५ | निर्मळ तलाव | मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग | २,४९,६४१/- | दि.१८ सप्टेंबर २०१९ ते माहे फेब्रुवारी २०२० | माहे मार्च २०२० ते माहे मार्च २०२१ |

तरी मार्च २०२१ पर्यंतचे कोव्हीड -१९ या कालावधीचे देयक अदा करणेकामी येणाऱ्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :** सदर प्रस्तावा मधील नमुद उद्याने, दुभाजके, हरितक्षेत्र देखभालीकरीता कार्यरत असलेल्या ठेकेदारास उद्यान देखभाल व संगोपन कामाकरीता माहे मार्च २०२० ते माहे मार्च २०२१ या कालावधीतील प्रलंबित देयके अदा करणेकामी होणाऱ्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १०५

विभाग: भांडार विभाग
दिनांक :०६/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती व मुख्यालयाकरिता पी.ए.सिस्टीम ध्वनीक्षेपक यंत्रणा खरेदी करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती कार्यालये असून दैनंदिन कामकाजासाठी प्रत्येक प्रभाग निहाय बोलेरो यूटीलीटी जीप वाहन दिलेले आहे. सदर वाहानाचा वापर अतिक्रमण, घरपट्टी, पाणीपट्टी वसूली दवंडी देणे व इतर शासकीय कामकाजासाठी करण्यात येते. याकामी वाहानावर दवंडी देणेकामी पी.ए.सिस्टीम ध्वनीक्षेपक यंत्रणा बसवल्यास त्याचा वापर महापालिकेच्या सर्व प्रकारच्या सुचना नागरीकांना देण्यासाठी होईल. याबाबत प्रभाग समिती स्तरावरुन ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविण्याबाबत वारंवार तोंडी मागणी येत आहे. त्याकरीता खालील तपशिलाप्रमाणे अहुजा कंपनीची ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविणे योग्य होईल. सदरची यंत्रणा पोलीस विभागाच्या वाहनांवरही कार्यरत असते व ते वेळोवेळी त्याचा वापर करत असतात.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | प्रति नग दर | आवश्यक नग | एकुण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1. | Mobile P A Amplifier with Horn Speaker 25 x T, Mice Beta 58 A Ahuja Company with Full Carrier Stainless Steel Stand 5 ft with fitting & Wiring Ahuja company full set. | प्रति नग १८५०० +१८% जी.एस.टी. (३३३०/-) एकूण २१८३०/- | ०९ नग | २,००,०००/- |

तरी महानगरपालिकेच्या ९ प्रभाग कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ९ बोलेरो युटीलीटी वाहनांवर उपरोक्त यंत्रणा बसविणेस व त्याद्वारे विविध कामाच्या सुचना देणेकामी दरपत्रके मागवून येणाऱ्या रक्कम रु. २ लक्ष खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती व मुख्यालयाकरिता दैनंदिन कामकाजासाठी प्रत्येक प्रभाग निहाय बोलेरो युटीलीटी जीप वाहन दिलेली आहे. सदर वाहनांवर अतिक्रमण, घरपट्टी, पाणीपट्टी वसूली दंवडी देणे व इतर शासकीय कामकाजासाठी महापालिकेच्या सर्व प्रकारच्या सुचना नागरिकांना देण्यासाठी पी.ए.सिस्टीम ध्वनीक्षेपक यंत्रणा खरेदी करण्यांस रक्कम रु. २ लक्ष खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४०६

विभाग: भांडार विभाग
दिनांक : ०६/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये दैनंदिन प्राप्त होणाऱ्या चलनी नोटा नकली नोटा तपासून मोजदाद करणेकामी प्रिसिजन कंपनीचे कांऊटींग मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती व मुख्यालय तसेच प्रभाग समिती अंतर्गत विभाग कार्यालये असून त्या अंतर्गत दैनंदिन कामकाजामध्ये मालमत्ता कर , पाणीपट्टी वसूली करण्यात येते. याकामी दैनंदिन प्राप्त होणाऱ्या चलनी नोटा नकली नोटा येत असतात व बँकेकडे भरणा करताना नकली नोटा सापडल्या जातात. अश्यावेळी कर्मचाऱ्यांना स्वत:कडील रक्कम चलनी नकली नोटांची रक्कम भरपाई करावी लागते. याकामी प्रभाग समिती कार्यालयाकडून नोटा मोजण्याचे मशिनची मागणी करण्यांत येत आहे. त्याकरीता खालील तपशीलाप्रमाणे नमुद केलेले चलनी नोटा मोजण्याचे मशिन खरेदी करुन विभागांना दिल्यास भरणा करतेवेळी नोट तपासून घेणे सोयीस्कर होईल. सध्या शहरामध्ये २५ ठिकाणी वसुलीचे कामकाज करण्यात येत असून त्यापैकी मोठ्या प्रमाणावर वसुली होणाऱ्या १८ ठिकाणांवर सदर मशिन उपलब्ध करुन देण्यास प्रति मशिन रक्कम रु. १६,०००/-(जी.एस.टी.सह) प्रमाणे रक्कम रु ३ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | तपशिल | खरेदी संख्या |
|---|---|---|
| १. | प्रिसिजन कंपनीचे मॉडेल क्र.INV-१२० MIX VALUE COUNTER मशिन | १८ |

तरी महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती व मुख्यालय तसेच प्रभाग समिती अंतर्गत विभाग कार्यालये इत्यादी ठिकाणी दैनंदिन कामकाजामध्ये मालमत्ता कर, पाणीपट्टी वसूली करण्याकरीता उपरोक्त तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे १८ नग मशिन दरपत्रके मागवून खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ३ लक्ष पर्यंतचे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव व पुढील आदेशास्तव सादर.

**ठराव :-** महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ०९ प्रभाग समिती व मुख्यालय तसेच प्रभाग समिती अंतर्गत विभाग कार्यालये इ. ठिकाणी दैनंदिन मालमत्ता कर, पाणीपट्टी वसूली करण्याकरिता प्रिसिजन कंपनीचे कांऊटींग मशिन खरेदी करण्यांस रक्कम रु. ३ लक्ष खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४०७

विभाग: भांडार विभाग
दिनांक :०६/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील चालू करण्यात आलेले कोविड-१९ हेल्थ सेंटरसाठी खरेदी केलेल्या साहित्य खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये कोविड-१९ चे रुग्णांवर उपचार करण्यांस आयसोलेशन केंद्रावर व कोविड-१९ लसीकरण मोहिमे अंतर्गत साहित्याची आवश्यकता होती. या मागणीसाठी लॉकडाऊन असल्याने मंजूर ई-निविदा नसल्याने खुल्या बाजारारमधून विना ई-निविदा तात्काळ खालील आवश्यक बाबी मे. जैन हॅडलूम मार्ट , मे. श्री नटराज मार्केटींग, मे. तुळशी मार्केटींग या पूरवठादाराकडून दि. २४/०६/२०२० ते दि. २६/०४/२०२१ या कालावधीत खरेदी केल्या आहेत. त्याबाबत त्यांचे खालील प्रमाणे बीले प्रलंबित असून ती अदा करावयाची आहेत.

| अ. क्र. | पुरवठादाराचे नाव | साहित्याचा तपशील | साहित्य वापर केलेले ठिकाण | साहित्य पुरवलेले दिनांक | खरेदी केलेले नग | मुळ किंमत | जी. एस.टी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | मे. जैन हॅडलूम मार्ट | चादर | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | १२/०९/२०२० | ३०० | १३० | ५% | ४०९५० |
| २) | मे. जैन हॅडलूम मार्ट | बेडशीट | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | १२/०९/२०२० | ३०० | ११५ | ५% | ३६२२५ |
| ३) | मे. जैन हॅडलूम मार्ट | बेडशीट | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | ३५० | १४० | ५% | ५१४५० |
| ४) | मे. जैन हॅडलूम मार्ट | चादर | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | १४० | १५० | ५% | २२०५० |
| ५) | मे. जैन हॅडलूम मार्ट | बेडशीट | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | ३५० | १४० | ५% | ५१४५० |
| ६) | मे. जैन हॅडलूम मार्ट | चादर | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | १४० | १५० | ५% | २२०५० |
| ७) | मे. जैन हॅडलूम मार्ट | बेडशीट | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | ३५० | १४० | ५% | ५१४५० |
| ८) | मे. जैन हॅडलूम मार्ट | चादर | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | २४० | १५० | ५% | ३७८०० |
| ९) | मे. श्री नटराज मार्केटींग | बकेट प्लास्टिक, बादली ५ लिटर | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | ३०० | २४ | १८% | ८४९६ |
| १०) | मे. श्री नटराज मार्केटींग | मग १००० ml | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | ४०० | १० | १८% | ४७२० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११) | मे. श्री नटराज मार्केटींग | पेट बॉटल २० लिटर (जार) | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | १५० | १११ | १८% | १९६४७ |
| १२) | मे. श्री नटराज मार्केटींग | १० लिटर पेट मटका (डिस्पेन्सर ) | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | ०८/०४/२०२१ | १७६ | १११ | १८% | २३०५२ |
| १३) | मे. श्री नटराज मार्केटींग | १० लि पेट मटका | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | २०/०४/२०२१ | १५२ | १११ | १८% | १९९०८.९६ |
| १४) | मे. श्री नटराज मार्केटींग | पेट बॉटल २० लिटर | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | २०/०४/२०२१ | १५० | १११ | १८% | १९६४७ |
| १५) | मे. श्री नटराज मार्केटींग | डायनिंग टेबल | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | २०/०४/२०२१ | ३० | १३१३ | १८% | ४६४८०.२ |
| १६) | मे. श्री नटराज मार्केटींग | बकेट ५ लिटर | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | २२/०४/२०२१ | २०० | २४ | १८% | ५६६४ |
| १७) | मे. श्री नटराज मार्केटींग | बकेट १८ लिटर | म्हाडा इमारत क्र. १०, १४ | २२/०४/२०२१ | ४०० | ८८.९८ | १८% | ४१९९८.५६ |
| १८) | मे. श्री नटराज मार्केटींग | चेअर | प्रभाग समिती (B) PHC | २२/०४/२०२१ | १०० | ४३६.४६ | १८% | ५१५०२.२८ |
| १९) | मे. श्री नटराज मार्केटींग | स्टूल राऊंड | तुळींज हॉस्पीटल | २३/०४/२०२१ | ३० | १९९.१६ | १८% | ७०५०.२६ |
| २०) | मे. श्री नटराज मार्केटींग | पेट बॉटल २० लिटर | तुळींज हॉस्पीटल | २६/०४/२०२१ | ४० | १११ | १८% | ५२३९.२ |
| २१) | मे. श्री नटराज मार्केटींग | १० लिटर पेट मटका | तुळींज हॉस्पीटल | २६/०४/२०२१ | २५ | १११ | १८% | ३२७४.५ |
| २२) | मे. श्री नटराज मार्केटींग | बकेट ५ लिटर | तुळींज हॉस्पीटल | २६/०४/२०२१ | २५ | २४ | १८% | ७०८ |
| २३) | मे. श्री नटराज मार्केटींग | लाईफ लॉंग बकेट १८ लि. | तुळींज हॉस्पीटल | २६/०४/२०२१ | २५ | ८८.९८ | १८% | २६२४.९१ |
| २४) | मे. श्री नटराज मार्केटींग | चेअर | तुळींज हॉस्पीटल | २६/०४/२०२१ | १६३ | ४३६.४६ | १८% | ८३९४८.७१ |
| २५) | मे. तुळसी प्लास्टीक इंडस्ट्रीज | १८ लिटर बकेट | तुळींज हॉस्पीटल | २४/०६/२०२० | ५०० | १०० | १८% | ५९००० |
| २६) | मे. तुळसी प्लास्टीक | ५ लिटर बकेट | **वरुण इंडस्ट्री** | २४/०६/२०२० | ५०० | ३२ | १८% | १८८८० |
| २७) | मे. तुळसी प्लास्टीक | १ लिटर मग | **वरुण इंडस्ट्री** | २४/०६/२०२० | ५०० | ११ | १८% | ६४९० |
| | **मे. जैन हॅंडलूम मार्ट** | | | | | | | ३,१३,४२५/- |
| | **मे. श्री नटराज मार्केटींग** | | | | | | | ३,४३,९६१.५८/- |
| | **मे. तुळसी प्लास्टीक इंडस्ट्रीज** | | | | | | | ८४,३७०/- |
| | **एकुण** | | | | | | | ७,४१,७५६.५/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील नैसर्गिक आपत्ती विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा पुरवठादार यांचे कडून अत्यावश्यक बाब असल्याने तात्काळ खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ७,४१,७५७/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

| 8 | | वसई विरार शहर महापालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता अखंडीत वीज पुरवठा करणें करिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणें. | **डिझेल जनित्र व्यवस्था** 30 केव्हीए डिझेल जनित्र-1 नग, प्लिंथ-1 नग, AMF पॅनल-1 नग **अंदाजपत्रकीय रक्कम-5,12,511/-** | मे.किंजल इलेक्ट्रीकल्स |

उपरोक्त नमुद 1 ते 8 कामांचे सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. सदर कामी होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "नैसर्गिक आपत्ती इतर" या लेखाशिर्षकातील रक्कम 10,00,00,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

वर नमुद केलेल्या बाबीनुसार येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये मा.आयुक्त सो., यांनी दि.04/05/2021 रोजीचे ठराव क्र.101 अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे. परंतु, सद्यस्थितीत कोरोना (कोविड-19) विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे निविदा प्रक्रिया राबवुन काम करुन घेण्यास विलंब होईल.

"वैद्यकिय आरोग्य सेवा" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाचुबंदर, विराट नगर, नवघर व फुलपाडा स्मशानभुमी मधिल गॅस दाहिनी करिता नव्याने विद्युतीकरण, डिस्ट्रीब्युशन व कंट्रोल पॅनल, अखंडीत वीज पुरवठा करणेंकरिता डिझेल जनित्र व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे करिता उपरोक्त नमुद शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार यांचे कडुन सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर **10% कमी दराने** काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५**

दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र. ११८

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- ११/०५/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर कार्यालयात Internet सुविधा सुरु करणे कामी दरपत्रके मागवुन तात्काळ एजन्सी नियुक्त करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिके अंतर्गत प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर कार्यालयात महानगरपालिके अंतर्गत असलेली दैनंदिनी कामे संगणका मार्फत केली जातात उदा. जन्म-मृत्यू, विवाह नोंदणी, घरपट्टी, आवक जावक, स्वच्छ भारत मिशन, ई-निविदा, आपले सरकार व PG Portal वरील तक्रारींचे निवारण करणे तसेच ई-मेल द्वारे पत्र व्यवहार करणे इत्त्यादी ऑनलाईन कामे करण्यासाठी इंटरनेटची आवश्यकता आहे.

त्याअनुषंगाने प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर कार्यालयात होणाऱ्या ऑनलाईन दैनंदिनी कामाकाजकरीता इंटरनेट सुविधा सुरु करण्यात आली आहे. परंतू सदर इंटरनेट सुविधेचा कालावधी संपुष्टात आला आहे. तरी इंटरनेट सुविधा बंद पडल्यास प्रभाग समिती 'एच' कार्यालयात होणाऱ्या दैनंदिन कामकाजामध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

सदर कार्यालयात होणारी दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालु राहण्यासाठी हाय स्पिड इंटरनेट सुविधा सुरु करणे कामी (१० Mbps unshared internet leased line १:१) एका वर्षाकरिता अंदाजीत रक्कम रु.२,९०,०००/- (सर्व करांसहीत) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखासांकेतांक क्र.९७३-२४७२, 'माहिती तंत्रज्ञान विभाग संगणकीय व्यवस्थापन खर्च' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी प्रभाग समिती 'एच' (नवघर-माणिकपूर) कार्यालयात Internet सुविधा सुरु करणे कामी दरपत्रके मागवुन तात्काळ एजन्सी नियुक्त करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर कार्यालयात Internet सुविधा सुरु करणे कामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्रं. ११८     विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-११/०५/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता अग्निशमन वाहन व यांत्रिकी उपकरणांसाठी डिझेल, पेट्रोल व ऑईल खरेदी करणे कामी प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणे बाबत व कार्यादेश देणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागात १) मुख्य अग्निशमन केंद्र आचोळे २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ३) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान ४) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ५) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ६) विराट नगर अग्निशमन केंद्र, विरार (प.) ७) नवघर अग्निशमन केंद्र, नवघर, वसई (पूर्व) अशी मिळुन एकुण ६ ठिकाणी अग्निशमन उपकेंद्र कार्यरत आहेत. अग्निशमन विभागाकडे सध्या एकुण ३१ वाहने कार्यरत आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | अग्निशमन वाहनाचा प्रकार | कंपनीचे नाव | मॉडेल नं. | वाहनांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वॉटर टेंडर | टाटा | 1612/1616 | 06 |
| २ | मिनी वॉटर टेंडर | टाटा | LPT 909 / 407 | 08 |
| ३ | फोम टेंडर | टाटा | 1612 | 01 |
| ४ | रेस्क्यु व्हॅन | टाटा | 1616 | 01 |
| ५ | वॉटर बाऊझर | टाटा | 2518 | 02 |
| ६ | क्विक रिस्पॉन्स व्हेईकल | टाटा | 202 | 01 |
| ७ | वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर | मान | CLA 31.300 BS IV | 01 |
| ८ | बोलेरो जीप | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा | Bol ZNX 2 wd BS4 | 02 |
| ९ | टु व्हिलर बुलेट वाहन | रॉयल एन्फील्ड | इलेक्ट्रा रेड | 07 |
| १० | टर्न टेबल लॅडर | मसर्डिज | Atgeo 1528 | 01 |
| ११ | हॅझमॅट | भारतबेंझ | 1617R (4x2) Cab BS IV | 01 |
| | | | **एकुण** | **31** |

उपरोक्त ३१ वाहने तसेच यांत्रिकी उपकरणांमध्ये जनरेटर - १० नग, पोर्टेबल पंप - ०९ नग, पेट्रोल सॉ कटर - १८ नग, इन्फ्लेटेबल बोट - ०५ नग इत्यादी उपकरणे अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागात कार्यरत असून सदर वाहने व उपकरणांकरीता अंदाजे मासिक ४८९६ लिटर डिझेल, ५०० लिटर पेट्रोल व १०० लिटर ऑईल इतक्या इंधनाची आवश्यकता असते.

तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेत एकुण ७ अग्निशमन केंद्रे असून प्रत्येक स्थानकात वाहनांचे विभाजन करुन प्रत्येक फायर स्टेशन हद्दीतील पेट्रोल पंपाव्दारे इंधन भरण्यात येते.

त्यानुसार १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) सनसीटी अग्निशमन केंद्र, वसई (प.) ३) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ४) नवघर अग्निशमन केंद्र, वसई (पूर्व) या अग्निशमन केंद्रातील वाहनांना मे. बसिन पेट्रोल सप्लाय कं. या पेट्रोल पंपामधून इंधन पुरवठा करण्यात येतो सदर इंधन पुरवठा करणे करीता वसई नगरपरिषद कार्यादेश जा.क्रं. वनप/भांडार/११०२ दिनांक १७/०८/२००२ चे मंजूरी अन्वये इंधन पुरवठा केला जात आहे.

१) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) या केंद्रातील वाहनांना मे. स्वस्तीक एजन्सी, नालासोपारा या पेट्रोल पंपामधून इंधन पुरवठा करण्यात येतो. सदर इंधन पुरवठा करणे करीता वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय नालासोपारा (प.) कार्यादेश जा.क्रं. वविशम/नासो/व.वि/ ५१४/२०१०-११ दिनांक ०३/०३/२०११ चे मंजूरी अन्वये इंधन पुरविले जाते.

तसेच १) विराट नगर अग्निशमन केंद्र, विरार (प.) २) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) या दोन अग्निशमन केंद्रातील अग्निशमन वाहनांना मे. राहील ऑटो पेट्रोल सप्लाय या पंपाव्दारे इंधन पुरवठा केला जातो.

संदर्भ क्रं. ४ नुसार सदर अग्निशमन वाहनांना मे. बसिन पेट्रोल सप्लाय कं. या पेट्रोल पंपामधूनच इंधनाचा पुरवठा केला जातो. बसिन पेट्रोल सप्लाय कं. हा पेट्रोल पंप तत्कालीन नगरपरिषद अस्तित्वात असलेपासून इंधनाचा पुरवठा शासकीय दैनंदिन दराने करीत आहे.

याबाबत मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा मुख्य लेखापरिक्षक यांनी सदर होणा-या खर्चास सक्षम अधिका-यांची मान्यता घेणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

तरी अग्निशमन वाहने व यंत्रसामग्री अत्यावश्यक सेवेत वापरात असल्याने व बसिन पेट्रोल सप्लाय कं. चे पेट्रोल पंप वसई रोड व विरार येथे असल्याने तसेच सेवा सुरळीत असल्याने विना निविदा शासकीय दैनंदिन असलेल्या दराप्रमाणे अग्निशमन वाहने व यंत्रसामग्रीसाठी लागणारे इंधन वंगण १) बसिन पेट्रोल सप्लाय कं. २) मे. स्वस्तीक एजन्सी ३) मे. राहील ऑटो पेट्रोल सप्लाय या पंपावरुन खरेदी करण्यांस व त्यासाठी सन २०२१-२२ या वर्षामध्ये रक्कम रु. ३० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

अग्निशमन वाहनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे करीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात <u>अग्निशमन व्यवस्था वाहन डिझेल / कटर मशिन डिझेल, पेट्रोल</u> या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु. ६५ लक्ष तरतुद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी अग्निशमन विभाग हा अत्यावश्यक व आणीबाणीच्या काळात सेवा पुरवठा विभाग असल्याने अग्निशमन विभागाच्या वाहनांना डिझेल, पेट्रोल व ऑईल इंधनाचा पुरवठा होणे अत्यावश्यक आहे. सबब उक्त इंधनापोटी होणा-या इंधनाच्या येणा-या अंदाजीत रक्कम रु. ३० लक्ष खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सादर.

<u>ठराव :-</u> वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील वाहनांना डिझेल, पेट्रोल व ऑईल इंधन खरेदी करणे अत्यावश्यक असून सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता वाहनांच्या इंधनापोटी होणा-या अंदाजीत रक्कम रु. ३० लक्ष खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - ११८

विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - ११/०५/२०२१

**प्रस्तवाचा विषय** - प्रभाग समिती (बी) हद्दीतील मोरेगांव येथील अमृत योजने अंतर्गत बांधलेल्या जलकुंभ परिसरात सुरक्षेकरीता आर.सी.सी. भिंत उभारणे व इतर किरकोळ कामे करणे

**प्रस्तवाचा मजकूर** - वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) हद्दीतील मोरेगांव येथील अमृत योजने अंतर्गत जलकुंभाचे बांधकाम करण्यात आले आहे. महानगरपालिका मार्फत सदर जलकुंभातुन लगतच्या परिसरात मनवेलपाडा, कारगील नगर, तुळींज विभागात पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पाणीपुरवठा अत्याआश्यक बाब असल्याने सदर जलकुंभ व सभोवतालचा परिसराच्या सुरक्षे कामी आर.सी.सी. भिंत उभारणे व इतर किरकोळ कामे करणे आवश्यक आहे. याकामी निविदा मागवून काम करावे लागणार आहे. कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती (बी) हद्दीतील मोरेगांव येथील अमृत योजने अंतर्गत बांधलेल्या जलकुंभ परिसरात सुरक्षेकरीता आर.सी.सी. भिंत उभारणे व इतर किरकोळ कामे करणे | रू.२,९६,२०५/- |

प्रभाग समिती (बी) हद्दीतील मोरेगांव येथील अमृत योजने अंतर्गत बांधलेल्या जलकुंभ परिसरात सुरक्षेकरीता आर.सी.सी. भिंत उभारणे व इतर किरकोळ कामे करणे करीता कामाच्या होणा-या रक्कम रू.२,९६,२०५/- अंदाजपत्रकास प्रशाकिय व वित्तीय मान्यते साठी प्रस्ताव सादर.

**ठराव** - सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती (बी) हद्दीतील मोरेगांव येथील अमृत योजने अंतर्गत बांधलेल्या जलकुंभ परिसरात सुरक्षेकरीता आर.सी.सी. भिंत उभारणे व इतर किरकोळ कामे करणे करीता महानगरपालिका अधिनियमाचे ~~कमल~~ कलम ४९ व ६८(१), ६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

Khandare

उप-आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - 920 | विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - 11/05/2021

**प्रस्तवाचा विषय** - प्रभाग समिती (बी) हद्दीतील तुळींज सरोदय वसाहत/ आंबेडकर नगर येथे ३०० मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहीनी वरील व्हॉलकरीता आर.सी.सी. चेंबर बांधकाम करणे, एम.एस. कव्हर बसविणे, कॉक्रीटीकरण व इतर किरकोळ कामे करणे.

**प्रस्तवाचा मजकूर** - वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) हद्दीतील तुळींज सरोदय वसाहत/ आंबेडकर नगर येथे उंच जल कुंभ बांधण्यात आला आहे. सदर जलकुंभातुन परिसरात पाणीपुरवठा करण्याचे प्रस्तावीत असल्याने उंच जल कुंभातुन 600 मी.मी. व्यासाची जलवाहीनी आंबेडकर नगर मुख्य रस्त्या पर्यंत अंथरण्यात आलेली आहे. सदरची जलवाहिनी महापालिकेच्या 300 मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहीनीस अंतर्गत क्रॉस कनेक्शन करणे, स्लुस व्हॉल बसवुन अंतर्गत जोडणी करण्यात आली आहे सदर जोडणीच्या ठिकाणी असलेल्या ३०० मी.मी. व्यासाचे स्लुस व्हॉल रस्त्याच्या मध्ये असल्याने पाणीपुरवठा सुरू बंद करताना व भविष्यात व्हॉल नादुरूस्त झाल्यास दुरूस्तीस अडचण येऊ शकते याकामी ३०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीवर कॉक्रीटीकरणे करणे, ३०० मी.मी. व्यासाच्या व्हॉलकरीता आर.सी.सी. चेंबर बांधकाम करणे, एम.एस. कव्हर बसविणे व इतर किरकोळ कामे करणे आवश्यकता आहे. पाणीपुरवठा अत्याआश्यक बाब असल्याने सदर काम करावे लागणार आहे. याकामी निविदा मागवून काम करावे लागणार आहे. कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती (बी) हद्दीतील तुळींज सरोदय वसाहत/ आंबेडकर नगर येथे ३०० मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहीनी वरील व्हॉलकरीता आर.सी.सी. चेंबर बांधकाम करणे, एम.एस. कव्हर बसविणे, कॉक्रीटीकरण व इतर किरकोळ कामे करणे | रू.२,६३,७४७/- |

प्रभाग समिती (बी) हद्दीतील तुळींज सरोदय वसाहत/ आंबेडकर नगर येथे ३०० मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहीनी वरील व्हॉलकरीता आर.सी.सी. चेंबर बांधकाम करणे, एम.एस. कव्हर बसविणे, कॉक्रीटीकरण व इतर किरकोळ कामे करणे करीता कामाच्या होणा-या रक्कम रू.२,६३,७४७/-अंदाजपत्रकास प्रशाकिय व वित्तीय मान्यते साठी प्रस्ताव सादर.

**ठराव** - सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती (बी) हद्दीतील तुळींज सरोदय वसाहत/ आंबेडकर नगर येथे ३०० मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहीनी वरील व्हॉलकरीता आर.सी.सी. चेंबर बांधकाम करणे, एम.एस. कव्हर बसविणे, कॉक्रीटीकरण व इतर किरकोळ कामे करणे करीता महानगरपालिका अधिनियमाचे कमल ४९ व ६८(१), ६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

Khandare

उप-आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व , जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७ ,
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ९२९ विभाग : नगर रचना

दिनांक : ११/०५/२०२१

---

प्रस्तावाचा विषय : वसई विरार नगर रचना विभागातील विवीध सर्व्हे नकाशे , गावनकाशे , रेकॉर्ड ड्रॉईग व अन्य ड्रॉईग संगणकावर करणे.
( Digitizing of Record Drawings in Autocad Software & Providing soft copy in Hard Drive)

प्रस्तावाचा मजकुर : उपरोक्त विषयान्वये वसई विरार नगर रचना विभागातील विवीध सर्व्हे नकाशे , गावनकाशे , रेकॉर्ड ड्रॉईग व अन्य महत्वाची ड्रॉईग हे कार्यालयात उपलब्ध असुन वेळोवेळी विवीध कामांसाठी त्यांची गरज भासते. सदर नकाशे साध्या व ट्रेसींग कागदावर उपलब्ध असुन सततच्या वापरामुळे फाटलेल्या अवस्थेत खराब व जीर्ण झालेले आहेत. सदर नकाशांच्या प्रती विवीध कार्यालयात वेळोवेळी सादर करावयास लागत असल्याकारणाने त्यांची जोपासना करणे अत्यावश्यक आहे. वरील नकाशे संगणकावर करून घेतल्यास त्याचा दर्जा व नेमकेपणा अचूकपणे दाखविण्यात येऊ शकतो तसेच भविष्यातील बदल संगणकीय नकाशांवर लवकरात लवकर होऊ शकतात. त्याकरीता सदरचे ड्रॉईग संगणकावर ऑटोकॅड सॉफ्टवेअरमध्ये करून घेतल्यास त्यांची वेळोवेळी प्रिंट घेता येईल व सदरचे ड्रॉईग कायमस्वरूपी महानगरपालिकेकडे उपलब्ध राहतील.

| अ.क्र. | तपशील | अंदाजित नकाशांची संख्या | नकाशांचे मोजमाप | | एकुण मोजमाप चौ. सेमी. |
|---|---|---|---|---|---|
| | | | लांबी सेमी. | रूंदी सेमी. | |
| १ | नॅशनल रिमोट सेन्सींग एजन्सीच्या वसई विरार करिता सर्वे शीट स्केल १:२५०० | २८० | ९५ | ६० | १५९६००० |
| २ | वसई खाडी सर्वे शीट स्केल १:५०० | १५० | ९० | ६० | ८१०००० |
| ३ | सीआरझेड नकाशे, इंजीनिअरींग सर्वे, टोपो शीट , गावनकाशे इत्यादी इतर नकाशे | २०० | १०० | ६० | १२००००० |
| | एकुण नकाशे | ६३० नग | | | ३६०६००० चौ. सेमी. |

वरील कामाकरिता येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| २ | ऑटोकॅडमधे तयार करावयाच्या नकाशांचे एकुण मोजमाप चौ. सेमी | 36,06,000 |
| ३ | वरील कामाचे अंदाजित दर रू. | 2.00 |
| ४ | **वरील कामासाठी येणारा अंदाजित खर्च रू.** | **72,12,000.00** |
| ५ | ३% कॉन्टिन्जेन्सी रक्कम रू. | 2,16,360.00 |
| ६ | **वरील कामासाठी येणारा एकुण अंदाजित खर्च रू.** | **74,28,360.00** |

सदर कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार जी. आय. एस. मॅपिंग / लॅन्ड युज अपडेशन / सी. आर. झेड. सर्वे / कन्स्ट्रेंटमार्कीग हया लेखाशीर्षमध्ये सन २०२०-२१ हया आर्थिक वर्षामध्ये रू. १५० लक्ष इतकी रक्कम मंजुर करण्यात आली आहे. सदर नगर रचना विभागामधील खालील नमुद यादीनुसार एकुण ६३० नकाशांसाठी ३६,०६,००० चौरस सेंटीमिटर इतके क्षेत्रासाठी सन २०२०-२१ हया आर्थिक वर्षासाठी संगणकीय नकाशे ऑटोकॅडमधे बनविण्याच्या कामाचे दर मागवुन काम करून घेण्यासाठी निविदा प्रक्रीयेसाठी व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेसाठी मान्यतेसाठी सादर.

मा: उपसंचालक

प्रशासकीय ठराव

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागातील विवीध सर्व्हे नकाशे, गावनकाशे, रेकॉर्ड ड्रॉईंग व अन्य ड्रॉईंग संगणकावर ऑटोकॅडमधे तयार करणे हया कामाचे दर निश्चीत करून कार्यादेशापासुन पुढील ३ वर्षा करिता एजन्सी नियुक्त करणे व त्याकामी येणा-या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता रू. 74,28,360.00 अक्षरी रूपये चौ-याहत्तर लक्ष अठठावीस हजार तीनशे साठ मात्र इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मा. आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जि-पालघर,पिन नं.-४०१३०५
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६,फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठरावक्र. :- ६२२

विभाग :- वाहन

दिनांक :-२१/५/२०२१

**प्रस्तावाचा विषय :- दरपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर**:- वसई-विरार शहर महानगरपालिका मालकिच्या मौजे गोखिवरे येथील क्षेपण भुमीतील डोझर दुरुस्ती करणे व खरेदी केलेले स्पेअरपार्ट फिटींग करणेकामी मॅकेनिकल (लेबर) काम करणेसाठी जा. क्र. वविशम/वाहन/ १८८/२०२०, दि.१८/०९/२०२० रोजीची जाहीर दरपत्रक http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करुन दि. २१/०९/२०२० तेदि. २९/०९/२०२० पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत इच्छुक पुरवठा दाराकडुन दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात आले होते. सदर मुदतीत एकुण ३ दरपत्रके प्राप्त झाली.

प्राप्त ३ दरपत्रकातील दरांची तुलनात्मक पडताळणी केली असता दरपत्रक खालीलप्रमाणे :-

मे. युनिव्हर्सल ऑटोमोबाईल - रु.२,९०,६४०/-
**मे.एन सी मोटर्स - रु.२,६८,८००/-**
मे.के.एल.इंटरप्रायजेस – २,८०,६७२/-

प्राप्त ३ दरपत्रकामधील दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. कमी दराचे दरपत्रकामधील दर बाजारभावाप्रमाणे पडताळणी केली असता योग्य व वाजवी आहेत. तरी वसई-विरार शहर महानगरपालिका मालकिच्या मौजे गोखिवरे येथील क्षेपणभुमीतील डोझर दुरुस्ती करणे व खरेदी केलेले स्पेअरपार्ट फिटींग करणेकामी मॅकेनिकल (लेबर) काम करणेसाठी दरपत्रकामधील मे. एन.सी.मोटर्स यांचे कमी दराचे दरपत्रक मंजुरीस शिफारस आहे.

**ठराव** :- सदर विषयावर सविस्तर चर्चा करणेत आली असता वसई-विरार शहर महानगरपालिका मालकिच्या मौजे गोखिवरे येथील क्षेपण भुमीतील डोझर दुरुस्ती करणे व खरेदी केलेले स्पेअरपार्ट फिटींग करणेकामी मॅकेनिकल (लेबर) काम करणेसाठी मे. एन.सी.मोटर्स यांचे प्राप्त झालेल्या र.रु. २,६८,८००/ - इतक्या कमी दराचे दरपत्रकास कार्योत्तर व अंतिम मंजूरी देणेत येत आहे.

**उप.आयुक्त (वाहन)**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ६२३

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २७/०५/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर कार्यालयात Internet सुविधा सुरु करणे कामी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील लघुत्तम दर मंजुर करुन L१ दरपत्रकधारका सोबत करारनाम करणेस व कार्यादेश देणेस मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर कार्यालयात Internet सुविधा सुरु करणे कामी प्रशासकीय ठरवा क्र. दि. / /२०२१ रोजीच्या मंजुरीनुसार जाहीर दरपत्रक सुचना दि. ०४/०५/२०२१ पासून ते दि. १०/०५/२०२१ रोजी ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (सी), चंदनसार, दुसरा मजला, माहिती तंत्राज्ञान विभागात मागवले असता, सदर कामाबाबत ३ दरपत्रके प्राप्त झाली असून त्यांच्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **१० Mbps Internet Lease Line १:१ with Router** | | | |
|---|---|---|---|
| अनु क्र. | दिनांक | पुरवठादार | एकूण दर (सर्व करांसहीत) |
| **१** | **०६/०५/२०२१** | **मेँ. इस्टानेट टेक्नोलॉजीस प्रा. लि** | **रु.२,७५,०००/-** |
| २ | १०/०५/२०२१ | मेँ. सावी इन्फीनेट प्रा. लि | रु.२,९४,५००/- |
| ३ | १०/०५/२०२१ | मेँ. काईट इंडीया | रु. २,९२,७००/- |

वरील प्राप्त दरपत्रकांची तुलनात्मक तक्त्याप्रमाणे दरांशी तुलना केली असता **मेँ. इस्टानेट टेक्नोलॉजीस प्रा. लि** यांच्या दरपत्रकातील दर सर्वात कमी व वाजवी असून सदरचे दर मंजूर करुन वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर कार्यालयात Internet सुविधा सुरु करणे कामी, त्यांच्याशी करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर कार्यालयात Internet सुविधा सुरु करणे कामी **मेँ. इस्टानेट टेक्नोलॉजीस प्रा. लि** यांचे लघुत्तम दर मंजूर करुन यांच्याशी संविदा करण्यास व कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जाभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९२४

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २७/०५/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' अंतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनसार, प्राथमिक आरोग्य केंद्र नारींगी व जिवदानी देवी रुग्णालय येथे इंटरनेट सुविधा पुरविणेकरीता दरपत्रके मागवून एजन्सी नियुक्त करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' अंतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनसार, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नारींगी व जिवदानी देवी रुग्णालय कार्यरत आहे. सदर वैद्यकीय आरोग्य केंद्रांमध्ये औषधसाठ्यांची संगणकीय नोंद ठेवणेकरीता महानगरपालिकेत ई-औषधी संगणक प्रणाली विकसीत केली आहे. सदर संगणक प्रणालीद्वारे औषध साठ्यांच्या साहीत्यांची माहिती एकत्रित संग्रहीत ठेवू शकतो. तसेच कोरोनाच्या पार्श्वभुमीवर केंद्रामध्ये येणारे पेंशंट, डिसर्चाज होणारे पेशंट, contract trassing updation, facility app, शासनांस डेली रिपोर्ट पाठविणे इत्यादी ऑनलाईन कामे दैनंदिन संगणका मार्फत केली जातात.

तसेच सद्यस्थितीत Covid-१९ विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासनाद्वारे लस तयार करण्यात आली असून सदर लस नागरिकांना देणेकामी शासनाच्या पोर्टल वर ऑनलाईल नागरीकांची नोंद करणे अनिवार्य आहे. सदर ऑनलाईन कामकाजासाठी वैद्यकीय आरोग्य केंद्रांअंतर्गत इंटरनेट सुविधा पुरविण्यात आली आहे. परंतू सदर इंटरनेट सुविधेचा कालावधी माहे फेब्रुवारी २०२१ रोजी संपुष्टात आलेला आहे.

वैद्यकीय आरोग्य केंद्रा अंतर्गत पुरविण्यात आलेली इंटरनेट सुविधा खंडीत झाल्यास दैनंदीन ऑनलाईन कामाजात अडथळे निर्माण होऊ शकतात. तरी सदर कामाकाज सुरळीत पणे सुरु ठेवणे कामी वैद्यकीय आरोग्य केंद्रा अंतर्गत तीन वर्षाकरीता इंटरनेट सुविधा पुरविणे कामीचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र | कार्यालये | इंटरनेट प्लान | रक्कम सर्व करांसहीत (तीन वर्षाकरीता) | Wi-Fi Router ३०० Mbps | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय आरोग्य केंद्र, नारंगी, विरार (पू) | १५Mbps १२ Months Unlimited | ४८,६००/- | १,५००/- | ५०,१००/- |
| २ | वैद्यकीय आरोग्य केंद्र, चंदनसार | १५Mbps १२ Months Unlimited | ४८,६००/- | १,५००/- | ५०,१००/- |
| ३ | जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार | १५Mbps १२ Months Unlimited | ४८,६००/- | १,५००/- | ५०,१००/- |
| | | | | **एकुण** | १,५०,३००/- |

उपरोक्त प्रमाणे वैद्यकीय अरोग्य केंद्रा अंतर्गत इंटरनेट सुविधा सुरु करणे कामी तीन वर्षाकरीता रक्कम रु. १,५०,३००/- इतका खर्च अपेक्षीत असून सदर खर्च लेखासांकेतांक क्र. ९७३-२४७२, माहिती तंत्रज्ञान विभाग संगणक व्यवस्थापन खर्च या लेखाशिर्ष अंतर्गत भागविता येऊ शकतो. तरी सदर कामी दरपत्रके मागवून एजन्सी नियुक्त करुन होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस मंजूरी मिळणेस्तव सादर

ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' अंतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनसार, प्राथमिक आरोग्य केंद्र नारींगी व जिवदानी देवी रुग्णालय येथे इंटरनेट सुविधा पुरविणेकामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

229-५

प्रशासकीय ठराव क्र. ९२५ विभाग : बांधकाम /
दिनांक : २६ / ०५ /२०२१

विषय : प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील पापडी मुख्य रस्त्यालगत लेक व्यु कॉम्प्लेक्स ते गावडे वाडी चाळी पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. २४,७७,९२०/- (पाईप रक्कम रु. वगळुन रु.१४,३६,०६४/- |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. ३७७ दि.१४/०१/२०२१ |
| तांत्रिक मंजुरी | :- | मा. कार्यकारी अभियंता पा.क्र. ०७ अ.क्र. ३० दि. १५/०१/२०२१ |
| ई -टेण्डरींग निविदा सुचना प्रसिध्दी तारीख | :- | वविशम/बांध/श.अ./८६/२०-२१ दि.१५/०१/२०२१ |
| वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि. | :- | दि.१८/०१/२०२१ |
| वृत्तपत्राचे नाव | :- | १) दै. सकाळ २) दै. द फ्रि प्रेस जर्नल ३) दै. परशुराम समाचार |
| ई-टेण्डरींग द्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख | :- | दि. १८/०१/२०२१ दु.३.०० पासुन ते दि. ०१/०२/२०२१ दु.३.०१ पर्यत |
| ई-टेण्डरींग द्वारे निविदा सुचना स्विकारण्याची तारीख | :- | दि. ०१/०२/२०२१ दु. ३.०० पर्यंत |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त | :- | ०१ |
| ई -टेण्डरींग फेर निविदा सुचना प्रसिध्दी तारीख | :- | वविशम/बांध/२६२/२०२१ दि. ११/०२/२०२१ |
| वृत्तपत्रातील फेर निविदा प्रसिध्दी दि. | :- | दि. १२/०२/२०२१ |
| वृत्तपत्राचे नांव | :- | १) दै. पुढारी २) दै. नरवीर चिमाजी ३) दै. मुंबई तरुण भारत |
| ई -टेण्डरींग फेर निविदा प्रिपरेशनची तारीख | :- | दि.१२/०२/२०२१ दु. ३.०० पासुन ते दि.२२/०२/२०२१ दु. ३.०१ पर्यंत |
| ई -टेण्डरींग फेर निविदा सुचना स्विकारण्याची तारीख | :- | दि. २४/०२/२०२१ |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा | :- | ०५ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | शहर अभियंता |

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल |
|---|---|---|---|
| १. | मे. एस. एस एंटर. | २.००% जास्त दराने | - |
| २. | मे. भालेश्वर एंटर | १.००% जास्त दराने | - |
| ३. | मे. इरा एंटर. | अंदाजपत्रकीय दराने | - |
| ४. | मे. महेश वि. सातपुते | ०.९९% कमी दराने | - |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. महेश वि. सातपुते** यांची ०.९९% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. महेश वि. सातपुते** यांच्या निविदेतील ०.९९% कमी दराने हा तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे व योग्य आहे.

दि२४/०३/२०२१ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. महेश वि. सातपुते** यांच्या ०.९९% कमी दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी **मे. महेश वि. सातपुते** यांच्या ०.९९% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील पापडी मुख्य रस्त्यालगत लेक व्यु कॉम्प्लेक्स ते गावडे वाडी चाळी पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी **मे. महेश वि. सातपुते** हयांची ०.९९% कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(क) अन्वये या ०.९९% कमी दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

22/5/2021

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

G:\New Folder\Kiran\Lake View\D-Tharav.docx

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९२६

विभाग: भांडार विभाग
दिनांक :२७/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ रुग्णांकरिता जेवणाचे डीश, नाश्ता, कंटनेर व पॅकींग पिशव्या खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या कोवीड-१९ पॉझिटीव्ह रुग्ण वाढत आहेत. या रुग्णांवर उपचार करण्यांस महानगरपालिकेचे चंदनसार येथील श्री. जीवदानी देवी रुग्णालय येथे दाखल करण्यांत येतात. तसेच म्हाडा इमारत क्र. १० बोळींज व वालीव येथील वरुण इंडस्ट्रीज येथे तयार केलेल्या विलगीकरण केंद्रामध्ये उपचार केले जातात.

विलगीकरण केंद्र म्हाडा इमारत क्र. १० बोळींज व वरुण इंडस्ट्रीज वालीव व चंदनसार येथील श्री जीवदानी देवी रुग्णालयात दाखल रुग्णांना सकाळचा नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण मोफत स्वरुपात जीवदानी मंदीर ट्रस्ट व महानगरपालिका यांचे मार्फत दररोज देण्यात येते. ही सुविधा दि. १५/०६/२०२० पासून सुरु आहे. यामध्ये नाश्ता कंटेनर, प्लास्टीक पिशव्या, चमचे व जेवणाचे कंटेनर तसेच वाटप वाहन, वाटप कर्मचारी इत्यादीची व्यवस्था महानगरपालिकेकडून करण्यांत येते व जेवण, नाश्ता हे शहरामधील श्री. जीवदानी देवी संस्थान यांचे मार्फत मोफत पूरविले जात आहे.

सध्या शहरामध्ये कोवीड रुग्णांचे प्रमाण वाढत आहे.व नाश्ता कंटेनर व जेवणाचे पॅकींगसह असलेले कंटनेटर संपलेले आहेत. त्यामुळे खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | तपशिल | प्रति दिवस आवश्यकता | पुढील कालावधीसाठी लागणारा साठा | मंजूर दर प्रति नग | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाच खणी जेवणाचा कंटेनर | ७६० | ४५६०० | १५ | ६८४००० |
| २ | नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम) | ५३३ | ३२००० | १.७० | ५४४०० |
| ३ | नाश्ता प्लास्टिक चमचा | ५० | ३००० | ०.३० | ९०० |
| ४ | ब्ल्यू एच एम बॅग ५१ मायक्रो २७ X ३० इंच | २९ | १७५० | ९.५० | १६६२५ |
| | | | | एकुण | ७,५५,९२५/- |
| | | | | GST १८% | १,३६,०६६.५/- |
| | | | | एकुण | ८,९१,९९१.५/- |

तरी कोविड उपचार केंद्र, विलगीकरण, अलगीकरण केंद्र ठिकाणी दैनंदिन अल्पोपहार व भोजन पुरवठा करण्यास लागणारे कंटेनर व उपरोक्त इतर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना

निविदा मे. श्रीजी सेल्स्, वसई यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ८,९१,९९२/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

तसेच सदरचा खर्च सन २०२१-२२ मधील नैसर्गिक आपत्ती विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

**ठराव** :- सदर व्यवस्था कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजने करिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावामधील उपचार केंद्र, विलगीकरण, अलगीकरण केंद्र ठिकाणी दैनंदिन अल्पोहार व भोजन पुरवठा करण्यास लागणारे कंटेनर तात्काळ पूरवठादार मे. श्रीजी सेल्स् यांच्याकडून विना ई-निविदा खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७ (३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त जेवणाचे डीश, पॅकींग पिशव्या, प्लास्टीक कंटेनर खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ८,९१,९९२/- (अक्षरी रुपये आठ लक्ष एक्याण्णव हजार नऊशे ब्याण्णव मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२६।११।२१

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२७

विभाग :- भांडार विभाग
दिनांक :२७/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय:-** **वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील चालू करण्यात आलेले कोविड-१९ हेल्थ सेंटरसाठी व लसीकरण मोहिमे अंतर्गत खरेदी केलेल्या साहित्य फिल्टर बसविणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ रुग्णांचे वाढते प्रमाण लक्षात घेता नव्याने माता बाल संगोपन केंद्र, जुचंद्र व तुळींज रुग्णालय या मनपाच्या दवाखान्यामध्ये कोविड उपचार केंद्र सुरु करण्यात आल्यामुळे या उपचार केंद्रावर पेट बॉटल, स्टूल, पाण्याचे जार इ. पाणी पिण्यास्तव व्यवस्था करणे आवश्यक होते. तसेच लसिकरण केंद्रावर मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने कोविड प्रतिबंधक लस दिल्यानंतर १५ मि. विश्रांती घेणे आवश्यक असल्याने प्लास्टिक खुर्च्या खरेदी करणे आवश्यक होते. खालील नमूद साहित्य खरेदी करण्याचे निर्देश मा. आयुक्त साहेब सो हयांनी दिलेले आहे. महापालिकेच्या उपचार केंद्र व लसीकरण केंद्रावर सदर साहित्य खरेदी करण्यास ई-निविदा काढल्यास त्याला बरास विलंब होईल. त्याकरिता विना ई-निविदा तात्काळ खालील आवश्यक बाबी मे. श्री नटराज मार्केटींग या पूरवठादाराकडून दि. ३०/०४/२०२१ ते दि. ०८/०५/२०२१ या कालावधीत खरेदी केल्या आहेत. त्याबाबत त्यांचे खालील प्रमाणे बीले प्रलंबित असून ती अदा करावयाची आहेत.

| अ. क्र. | पुरवठादाराचे नाव | साहित्याचा तपशील | साहित्य वापर केलेले ठिकाण | साहित्य पुरवलेले दिनांक | खरेदी केलेले नग | मुळ किंमत | जी. एस. टी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | मे. श्री नटराज मार्केटींग | १० लिटर पेट मटका (डिस्पेन्सर) | माता बाल संगोपन केंद्र, जूचंद्र व तुळींज हॉस्पिटल | ३०/०४/२०२१ | ५० | १११ | १८ % | ६५४९ |
| २) | मे. श्री नटराज मार्केटींग | पेट बॉटल २० लिटर (जार) | | ३०/०४/२०२१ | ५० | १११ | १८ % | ६५४९ |
| ३) | मे. श्री नटराज मार्केटींग | स्टूल राऊंड | | ३०/०४/२०२१ | ५० | १९९.१६ | १८ % | ११७५०.४४ |
| ४) | मे. श्री नटराज मार्केटींग | डायनिंग टेबल | | ३०/०४/२०२१ | २५ | १३१३ | १८ % | ३८७३३.५ |
| ५) | मे. श्री नटराज मार्केटींग | चेअर | लसीकरण केंद्र | ०७/०५/२०२१ | ३०० | ४३६.४६ | १८ % | १५४५०६.८४ |
| ६) | मे. श्री नटराज मार्केटींग | चेअर | | ०७/०५/२०२१ | ३५० | ४३६.४६ | १८ % | १८०२५७.९८ |
| ७) | मे. श्री नटराज मार्केटींग | चेअर | | ०८/०५/२०२१ | ३५० | ४३६.४६ | १८ % | १८०२५७.९८ |
| | | | | | | | एकुण | ५,७८,६०४.७/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील नैसर्गिक आपत्ती विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा पुरवठादार मे. श्री नटराज मार्केटींग, वसई यांचे कडून अत्यावश्यक बाब असल्याने तात्काळ खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ५,७८,६०५/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-** सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजने करिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद साहित्य पूरवठादार मे. श्री नटराज मार्केटींग, वसई हयाच्यांकडून विना ई निविदा तात्काळ थेट खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपचारक केंद्रावर व कोविड-१९ लसीकरण केंद्रावर साहित्य खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. ५,७८,६०५/- (अक्षरी रुपये पाच लक्ष अठ्ठयाहत्तर हजार सहाशे पाच मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिक

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२८

विभाग :- भांडार विभाग
दिनांक : २७/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फिरते लसिकरण केंदाचे ठिकाणी एअरटेल कंपनीचे सिम खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ चे साथीचे रोगाचा प्रादुर्भाव झालेला असून प्रतिबंधात्मक उपाय योजना व उपचार योजना महानगरपालिकेकडून करण्यांत येत आहेत.

कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत कोविड पेशंट सार्वजनिक वाहतूक साधनेद्वारे प्रवास करत असल्याने शहरामध्ये कोविड-१९ साथीचे रुग्ण वाढतात. कोविड-१९ पॉझीटीव्ह रुग्णांना महानगरपालिकेच्या उपचार केंद्रावर रुग्णांचे घरापासून ने-आण करण्यांस महापालिकेने १०० रिक्षा भाडयाने घेण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.

सदर रिक्षामध्ये व ॲम्बूलसमधील डॉक्टर परिचारिका यांना उपचार केंद्रावर सर्च करणे तसेच होम आयसोलेशन मध्ये असणाऱ्या रुग्णांवर लक्ष ठेवणे व त्यांची फोन वरुन माहीती घेण्यांस परिचारिकांना व डॉक्टारांना मोबाईल व सिम कार्ड ६५ नग देणेबाबत उप आयुक्त वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी तोंडी सूचना दिलेल्या आहेत.

तसेच ड्राईव्ह ईन या मोहिमे अंतर्गत ४५ वर्षावरिल नागरिकांना कोविड प्रतिबंधक लसिकेंद्रावर लस देण्यासाठी ने-आण करण्यास ९ नग बसेस ची व्यवस्था केली असून बसमध्ये लसिकरण करण्यात येणार आहे. याकरिता बसमधिल लसिकरण करणाऱ्या डॉक्टर परिचारिका यांनाही मोबाईल व सिमकार्ड देण्याबाबत मा. उप आयुक्त वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी सुचना दिलेल्या आहे.

वरिल कामासाठी एकुण ६५ नग सिम कार्डची तोंडी मागणी मा. उप आयुक्त वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी केलेली आहे. सदर मागणीप्रमाणे एअरटेल कंपनीचे बिलींग प्लान (मासिक भाडे) रु. २२५ + १८% GST प्रमाणे रक्कम रु. २६६/- प्रति महिना खर्च येईल. या करिता एकुण ६५ ठिकाणी एअरटेल कंपनीचे सेल्यूलर सेवा मासिक भाडे तत्वाने घेण्यास प्रति महिना रक्कम रु. १७,२९०/- प्रमाणे एक वर्षाकरिता रक्कम रु. २,०७,४८०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच सदरचा खर्च सन २०२१-२२ मधील रुग्णालय व शहरांतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत दवाखाना, रुग्णालय निदान केंद्र दुरध्वनी खर्च या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी महानगरपालिकेच्या फिरत लसिकरण केंद्र येथे एअरटेल कंपनीचे सिम कार्ड खरेदी करावयाचे असून त्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे. भारती एअरटेल लि. या सेवा कंपनीकडून

विना ई-निविदा तात्काळ थेट खरेदी करण्यांस येणाऱ्या रक्कम रु. २,०७,४८०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव:-** कोविड-१९ पॉझीटीव्ह रुग्णांना तातडीन संपर्क करुन उपचारासाठी महानगरपालिका रुग्णालयामध्ये दाखल करणे तसेच दैनंदिन होम आयसोलेशन मधील रुग्णांची चौकशी करणे या कामासाठी महानगरपालिकेचे डॉक्टर, परिचारिका यांना संपर्क करण्यांस तसेच नागरिकांनाही मदतीसाठी डॉक्टर यांचेशी संपर्क करण्यांस तसेच फिरते लसिकरण व त्याद्वारे कोविड रुग्ण आटोक्यामध्ये आणणेसाठी मे. भारती एअरटेल लि. हयाच्यांकडून विना ई निविदा तात्काळ थेट खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी एअरटेल कंपनीचे सिम कार्डचे बिलींग प्लान (मासिक भाडे) रक्कम रु. २२५ + १८% GST प्रमाणे एक वर्षाकरिता येणाऱ्या वार्षिक रक्कम रु. २,०७,४८०/- (अक्षरी रुपये दोन लक्ष सात हजार चारशे ऐंशी मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिक

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ४२८

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-२७/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागा करीता ४ नग मकिटा कंपनीचे सॉ कटर मशिन खरेदी करणे कामी प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये तौक्ते चक्रीवादळामुळे जोरात पाऊस व वादळी वारे वाहू लागले आहेत त्यामुळे प्रभाग समिती क्षेत्रामधील रहदारीच्या ठिकाणी, वस्तीच्या ठिकाणी, घरावर, इमारतींवर, विद्युत तारांवर, ट्रांन्सफॉर्मरवर, वाहनांवर, रस्त्यावर खुप मोठया प्रमाणात झाडे उन्मळून पडली आहेत त्यामुळे सदर झाडे हि कापून बाजुला करण्यासाठी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिनची आवश्यकता आहे. तसेच सद्या उपलब्ध असलेल्या काही कटर मशीन नादुरुस्त झालेल्या आहेत. त्यामुळे मा. आयुक्त महोदय यांनी सदर मशिनची आवश्यकता व महत्व समजून घेऊन सदर मशिन खरेदी करणे करीता सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार मकिटा कंपनीचे सॉ कटर विना निविदा थेट मकिटा कंपनीचे अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणे करीता प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र | तपशील | दर प्रति नग | खरेदी नग | एकुण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | Makita Chain Saw Cutter EA7900P (Supply with 24” guide bar & Chain) | 63550/- | 4 | 2,54,200/- |
| | | | **१८% GST** | 45,756/- |
| | | | एकुण | 2,99,956/- |

सदर मकिटा कटर मशिन खरेदीस होणारा खर्च वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर ४ नंबरचे लेखाशिर्ष अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी यामध्ये एकुण वार्षिक रक्कम रुपये ६०,००,०००,/- (अक्षरी रक्कम साठ लक्ष रुपये ) तरतुद असून सदर खर्च या तरतुदी मधून करता येईल.

तसेच येत्या जुन पासून पावसाळा सुरु होणार असून वादळी वा-यामुळे महापालिका क्षेत्रात झाडे उन्मळून पडण्याचे प्रकार जास्त घडतात तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा तातडीने मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिन कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. साई समर्थ प्लेईंग इक्विपमेंट, पुणे यांचेकडून खरेदी करता येणे शक्य होईल.

तरी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन नविन सॉ कटर मशिन ४ नग विना निविदा थेट अधिकृत विक्रेत्याकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ पोटकलम ५ (२) (२) अन्वये थेट खरेदी करुन कार्यादेश देण्यास व येणा-या अंदाजित रक्कम रु. २,९९,९५६/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये तौक्ते चक्रीवादळामुळे झाडे उन्मळून पडण्याचे प्रकार जास्त घडले असून सदर झाडे हि कापून बाजुला करण्यासाठी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिनची आवश्यकता असल्याने सदर मशिन विना निविदा थेट अधिकृत विक्रेते मे. साई समर्थ प्लेईंग इक्विपमेंट, पुणे यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ पोटकलम ५ (२) (२) अन्वये थेट खरेदी करुन कार्यादेश देण्यास व येणा-या अंदाजीत रक्कम रु. २,९९,९५६/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

27/11/2021

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९२० विभाग : वैद्यकीय आरोग्य

दिनांक :२७/०५/2021

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कोव्हीड-१९ रुग्णालये/दवाखाने/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व इतर येथे आवश्यक Antigen Detection Test Kit विनानिविदा खरेदी करुन आदेश देणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. सद्यस्थितीत कारोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता कोव्हीड-१९ रुग्णालये/दवाखाने/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व इतर येथे प्रतिबंधात्मक उपाययोजना (तपासणी)करणेकरीता आवश्यक Antigen Detection Test खरेदी करणे अत्यावश्यक आहे. सदर Antigen Detection Test तातडीने खरेदी करणे कामी महाराष्ट्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५.२.२ अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल. सबब मे.डॉ.सिध्दी लॅबोरेटरीज,विरार यांनी सोबत जोडलेले दरपत्रक सादर केलेले आहे. याबाबतचा दरासह तपशिल खालीलप्रमाणे आहे. तसेच सदर किट चा समावेश ICMR approved and GeM registered COVID-19 RAT Kits मध्ये समावेश आहे.

| अ.क्र. | उपकरणाचे नाव | वितरकाचे नाव | दर | मागणी | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | Meriscreen Covid-19 Antigen Detection Test (Meril Diagnostics) | डॉ.सिध्दीलॅबोरेटरीज विरार | रु.१२५/- | ५०००० नग | रु.६२,५०,०००/- |
| | | | | जी.एस.टी.- १२% | रु.७,५०,०००/- |
| | | | | एकुण | रु.७०,००,०००/- |

यानुसार मे.डॉ.सिध्दी लॅबोरेटरीज, विरार या वितरकांकडून प्राप्त दरपत्रकातील दरांबाबत मा.आयुक्त महोदयांशी झालेल्या चर्चेनुसार सदरचे Meriscreen Covid-19 Antigen Detection Test (Meril Diagnostics) उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. कोरोना विषाणू संसर्गाची वाढती संख्या लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना (तपासणी)करणेकरीता आवश्यक Antigen Detection Test (Meril Diagnostics) ५०००० नग तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. सदरकामी रक्कम रु.७०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात "रुग्णालय औषधे खरेदी" या लेखाशिर्षाखाली रु.१०,००,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आली असुन या तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. तरी सदरचे Antigen Detection Test (Meril

Diagnostics) विनानिविदा खरेदी करुन आदेश देणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास सदरचा विषय प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार मे.डॉ.सिद्धी लॅबोरेटरीज, विरार यांचेमार्फत Antigen Detection Test (Meril Diagnostics) ५०००० नग खरेदी करुन आदेश देणेकामी येणाऱ्या रक्कम रु.७०,००,०००/- (अक्षरी- सत्तर लाख रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

27/5/21

(सतिश लोखंडे)

आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** १३१

**विभाग : वैद्यकीय आरोग्य**
**दिनांक :** २७/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत कार्यरत प्रभागनिहाय कोरोना कंट्रोल वॉर रुम मध्ये तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय कार्यालयीन कामकाज करणेसाठी वैद्यकीय महाविद्यालयातील शिकाऊ (Internship) वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा महानगरपालिकेकडे ३ महिन्यासाठी अथवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव कमी होईपर्यंत अथवा जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत मासिक मानधन प्रत्येकी रु.२०,०००/- देऊन नियुक्त करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महनगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर डी. एम. पेटीट रुग्णालय, वसई (प.) व विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा (पू.) अशी २ रुग्णालये कार्यरत आहेत. तसेच ३ माताबाल संगोपन केंद्रे, विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व ३ दवाखाने, कोव्हीड रुग्णालये व इतर कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालये/माताबाल संगोपन केंद्रे/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखान्यांचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सदरकामी लागणारा वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) यानुसार मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येतो.

सबब कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी क्वारंटाईन सेंटर,कोव्हीड केअर सेंटर,समर्पित कोव्हीड केअर सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर, स्थापन केली आहेत आणि टेस्टींग सेंटर बाबतची माहिती,बेडची उपलब्धता दाखल रुग्ण, रुग्णवाहिका सेवा,कोव्हीड लसीकरण यांची माहिती नागरीकांना पुरविणेकामी प्रभाग निहाय कोरोना कंट्रोल वॉर रुम स्थापित केलेले आहेत. त्यानुसार वैद्यकीय महाविद्यालयातील शिकाऊ (Internship) वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा वर्ग केलेली असुन याकामी प्रभागनिहाय ५ कर्मचारी असे एकुण ४५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

याँकामी कोरोना कंट्रोल वॉर रुम मध्ये तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय कार्यालयीन कामकाज करणेसाठी वैद्यकीय महाविद्यालयातील शिकाऊ (Internship) वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा महानगरपालिकेकडे ३ महिन्यासाठी अथवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव कमी होईपर्यंत अथवा जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत मासिक मानधन प्रत्येकी रु.२०,०००/- प्रमाणे ३ महिन्याकरीता अंदाजे रु.२७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात "वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखाशिर्षाखाली रु.३१,२१,५०,०००/- इतकी तरतुद प्रस्तावित करण्यांत आलेली असून यामधून सदरचा खर्च भागविता येईल. सबब महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा व कोव्हीड-१९ चे कामकाज लक्षात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ३ महिन्यासाठी अथवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव कमी होईपर्यंत अथवा जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत मासिक मानधन प्रत्येकी रु.२०,०००/- देऊन नियुक्त करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत कार्यरत प्रभागनिहाय कोरोना कंट्रोल वॉर रुम मध्ये तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय कार्यालयीन कामकाज करणेसाठी वैद्यकीय महाविद्यालयातील शिकाऊ (Internship) वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा महानगरपालिकेकडे ३ महिन्यासाठी अथवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव कमी होईपर्यंत अथवा जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत मासिक मानधन प्रत्येकी रु.२०,०००/- असे एकुण ४५ कर्मचाऱ्यांकरीता अदांजे ३ महिन्याकरीता रु.२७,००,०००/- इतक्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कंत्राटी पध्दतीने सेवा घेणेस येत आहे. याकामी वेतनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

२७/५/२०

(सतिश लोखंडे)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका